दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र वर्ष–६ अंक–२१० गुरूवार दि.२२ ऑक्टोबर २०२६ RNI No.: MAHMAR/2021/858 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

संपादकीय....

दिशाहीन आर्थिक धोरण अन् वास्तवाचा आरसा

गेल्या काही वर्षांपासून भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे असा टिमकी वाजवणारा प्रचार केंद्रातील सत्ताधाऱ्यांकडून सातत्याने केला जात आहे. परंतु, घोषणांचे फुगे आणि वास्तवातील आकडेवारी यात किती प्रचंड तफावत आहे, याचा प्रत्यक्ष प्रत्यय २१ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या आर्थिक घडामोडींनी संपूर्ण देशाला आणून दिला आहे. एकाच दिवशी तीन मोठे आर्थिक धक्कादायक संकेत समोर आले- रिझर्व्ह बँकेने सरकारी कर्जाच्या २३,००० कोटी रुपयांच्या ट्रेझरी बिलांचा लिलाव पूर्णपणे रद्द केला, रुपयाची ऐतिहासिक घसरण कायम राहिली आणि शेअर बाजारात निफ्टी-सेन्सेक्सची लाल रंगात रंगाभरण झाली.

नमो शेतकरी योजनेचे दोन हप्ते रखडले!

दिल्ली । वृत्तसंस्था

दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या राज्यातील शेतकऱ्यांना आता 'नमो शेतकरी महासन्मान निधी'योजनेच्या रखडलेल्या हप्त्यांची प्रतीक्षा आहे. या योजनेचे नववे आणि दहावे हप्ते अद्याप वितरित झाले नसल्याने सुमारे ९२ लाख पात्र लाभार्थ्यांचे लक्ष राज्य सरकारच्या निर्णयाकडे लागले आहे. दोन्ही हप्त्यांपोटी शेतकऱ्यांना एकूण चार हजार रुपये मिळणे अपेक्षित असून, त्यासाठी सुमारे ३ हजार ७०० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. मात्र, निधी मंजुरीबाबत अद्याप निर्णय झालेला नसल्याने शेतकऱ्यांची प्रतीक्षा कायम आहे.

९२ लाख शेतकऱ्यांना चार हजारांच्या प्रतीक्षेत



राज्य सरकारने दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची आगाऊ मदत देण्याची घोषणा केली आहे. मात्र, ही मदत आणि पीएम किसान सन्मान निधी व नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचे हप्ते हे स्वतंत्र लाभ आहेत. त्यामुळे दुष्काळी मदतीबरोबरच रखडलेल्या हप्त्यांची रक्कमही तातडीने वितरित करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपयांचे अर्थसहाय्य तीन समान हप्त्यांत दिले जाते. केंद्र सरकारच्या पीएम किसान सन्मान निधी योजनेला पूरक म्हणून राज्य सरकारने ऑक्टोबर २०२३ मध्ये या योजनेची अंमलबजावणी सुरू केली. पीएम किसान योजनेच्या तेराव्या हप्त्यापासून नमो शेतकरी योजनेचे अनुदान वितरित करण्यास सुरुवात झाली. दरम्यान, पीएम किसान योजनेचे २३ हप्ते वितरित झाले असताना नमो शेतकरी योजनेचे नववे आणि दहावे हप्ते अद्याप प्रलंबित आहेत. या दोन्ही हप्त्यांच्या वितरणासाठी ▶▶ पान २ वर

मराठा समाजाला विरोध करणाऱ्याला २१ मध्ये पाडायचेच !

भाजपकडून ५०० कोटी रुपये कोणी घेतले? नारायणगडावर दसरा मेळाव्यात मनोज जरांगे यांचा एकनाथ शिंदेंना सवाल

बीड । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र नारायणगड येथे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत दसरा मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या मेळाव्यात बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी भाजप व महायुती सरकारमधील अंतर्गत घडामोडींवरून जोरदार निशाणा साधला. मराठा समाजाला कोणी विरोध करत असेल तर त्याला २०१९ च्या निवडणुकीमध्ये पाडा माझ्या नावाने भाजपकडून ५०० कोटी रुपये कोणी आणले याचा खुलासा करावा असा इशारा देखील त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिला.



जनसमुदायासमोर बोलताना अडीच वर्षांपूर्वी शिजलेल्या एका कटाचा संदर्भ देत जरांगे म्हणाले, भाजप नेत्यांमधील चर्चेत जरांगे यांना ५०० कोटी द्यायचे आहेत, असा उल्लेख होता. मग ५०० कोटी रुपये नेमके कोणी आणले? श्रीकांत शिंदे यांच्या हातून ५०० कोटी मला खरेच दिले का? यातले खरे-खोटे काय आहे, ते उद्यापर्यंत जनतेला सांगावे. भाजप तुम्हाला संपवायला निघाले आहे की तुम्ही मला संपवायला निघाले आहात, हे एकदा उघड झाले पाहिजे, असे थेट आव्हान त्यांनी या वेळी दिले. पुढे बोलताना मनोज जरांगे म्हणाले, राज्यातील शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये तातडीने मदत द्यावी, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती करावी, पीकविम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात थेट जमा करावी, प्रलंबित अनुदान वितरित करावे आणि दुष्काळग्रस्त भागात ▶▶ पान २ वर

दुष्काळात सर्वांनी एकत्र येण्याची गरज भगवान भक्तिगडावरील दसरा मेळाव्यात पंकजा मुंडेंचे आवाहन

पाटोदा–सावरगाव घाट । प्रतिनिधी

जातीपातीच्या जीवावर जो नेता राज्य करू इच्छितो आणि मोठा होऊ पाहतो, त्याला कोणतेही भविष्य नसते. देशाचे नेतृत्व करण्यासाठी एखाद्या सुशिक्षित आणि हुशार माणसाची गरज असते, जो देशाला जागतिक सत्ता बनवू शकेल. मात्र, स्वत:चा अजेंडा नसलेला माणूस समाजाला केवळ विषारी आणि विखारी दिशा देण्याचे काम करतो, अशा शब्दांत नेत्या पंकजा मुंडे यांनी जातकेंद्रित राजकारणावर तीव्र ताशेरे ओढले.



पाटोदा तालुक्यातील सावरगाव घाट येथील भगवान भक्तिगडावर मंगळवारी दसरा मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या वेळी उपस्थित अथांग जनसागराला संबोधित करताना त्यांनी विविध विषयांवर भूमिका मांडली. या दसरा मेळाव्यास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आमदार धनंजय मुंडे, माजी मंत्री महादेव जानकर, माजी खासदार डॉ. प्रीतम मुंडे, सुजय विखे पाटील, मोनिका राजळे, माजी आमदार बदामराव पंडित, भीमराव धोंडे, यशश्री मुंडे, लक्ष्मण हाके यांच्यासह विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित प्रचंड जनसमुदायाला मार्गदर्शन करताना ▶▶ पान २ वर

निधी न दिल्यास मुख्यमंत्र्यांना 'खारा दिवाळी फराळ' - एसटी कर्मचारी

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला (एसटी) आवश्यक निधी ४ नोव्हेंबरपर्यंत न दिल्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना 'खारा दिवाळी फराळ' पाठवून सरकारच्या अर्थ खात्याचा निषेध करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी नुकताच दिला. एसटीने सवलत मूल्याची थकबाकी, दैनंदिन खर्चासाठी आवश्यक अतिरिक्त निधी आणि दिवाळी भेटीची रक्कम देण्याची मागणी केली आहे. ही रक्कम ३ नोव्हेंबरपर्यंत न मिळाल्यास ४ नोव्हेंबर रोजी हे निषेध आंदोलन करण्यात येईल, असे बरगे यांनी सांगितले. एसटीने सरकारकडे निधीची मागणी केल्यानंतर अर्थ खात्याकडून वारंवार त्यात मिठाचा खडा टाकला जात असल्याचा आरोप बरगे यांनी केला.

५०० कोटींच्या आरोपांचा पुरावा द्या

शिंदे यांचे मनोज जरांगे यांना आव्हान

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

कोणाला ५०० कोटी रुपये दिले किंवा घेतले, असा प्रश्नच नाही. मनोज जरांगे पाटील यांनी आरोप करण्यापूर्वी त्याची शहानिशा करायला हवी होती. त्यांच्याकडे माहिती असेल तर त्यांनी संबंधित यंत्रणांकडे पुरावे द्यावेत. दूध का दूध, पाणी का पाणी झाले पाहिजे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (दि. २१) मनोज जरांगे पाटील यांच्या आरोपांना उत्तर दिले. 'माझ्या कामाची पद्धत सर्वांना माहिती आहे,' असेही त्यांनी स्पष्ट केले.



राष्ट्रपतींना कुंभमेळ्याचे निमंत्रण देण्यासाठी आलेल्या शिष्टमंडळात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे देखील होते. राष्ट्रपतींच्या भेटीनंतर उपमुख्यमंत्र्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, जरांगेंच्या आरोपावर आमचे प्रवक्ते आणि अन्य नेते बोलत आहेत. कोणी कोणाला पैसे दिले नाहीत आणि घेतलेही नाहीत. पैसे घेतले आणि दिले असे बोलणाऱ्यांनी त्या संबंधातील पुरावे द्यावेत. संबंधित यंत्रणा या सगळ्याची चौकशी करतील. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह ▶▶ पान २ वर

सीजेपीच्या आशुतोष रांका आणि सौरव दास यांना मोठा दिलासा; न्यायालयाकडून जामीन मंजूर



दिल्ली । वृत्तसंस्था

दिल्लीच्या विशेष कार्यकारी दंडाधिकारी न्यायालयाने सीजेपी नेते सौरव दास आणि आशुतोष रांका यांच्या न्यायालयीन कोठडीबाबतचा आपला निर्णय राखून ठेवला होता. त्यानंतर त्यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे. दिल्ली पोलिसांनी त्यांची न्यायालयीन कोठडी आणखी तीन दिवसांनी वाढवण्याची मागणी केली होती.

आशुतोष रांका आणि सौरव दास यांना बुधवारी दोन्ही नेत्यांना विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले होते.याआधी, दोन दिवसांपूर्वीच सीजेपीचे सह-संयोजक सौरव दास आणि आशुतोष रांका यांची न्यायालयीन कोठडी दोन दिवसांनी वाढवण्यात आली होती. सोमवारी त्यांना मंदिर मार्ग पोलीस ठाण्यातील नवनियुक्त विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले होते. ▶▶ पान २ वर

टायगर श्रॉफ गोळीबार प्रकरण दिल्ली पोलिसांकडून चौघांना अटक

दिल्ली । वृत्तसंस्था

अभिनेता टायगर श्रॉफच्या कारवर झालेल्या गोळीबार प्रकरणी दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने दोन महिलांसह चार जणांना अटक केली आहे. हे आरोपी परदेशातून कारवाया करणाऱ्या अनिल पंडित नावाच्या गुंडाच्या सांगण्यावरून काम करत असल्याचा संशय पोलिसांना आहे.

कुणाल (२१) आणि सुमित (१९, दोघेही रा. हरियाणा), राधा (२३) आणि बबिता (२३, दोघीही रा. उत्तर प्रदेश) अशी अटक करण्यात ▶▶ पान २ वर

पुढील ४ महिन्यांमध्ये देशात काहीतरी मोठी गडबड होईल- राज ठाकरे

मुंबई । प्रतिनिधी

पुढील तीन –चार महिन्यात देशात काहीतरी मोठी गडबड होईल. येत्या काळात देशात गंभीर परिस्थिती निर्माण होऊन संपूर्ण देश रस्त्यावर येऊ शकतो असा खबळबळजनक दावा मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी



बुधवारी केला. तसेच पुढे बोलताना राज ठाकरे म्हणाले की, त्याचबरोबर पुढील काही काळ असाही येऊ शकतो की, देशाला काही काळ पंतप्रधानच नसतील असा दावाही यावेळी केला.

मुंबई प्रेस क्लबच्या इमारतीत छायाचित्रकार गजानन दुधाळकर यांच्या 'डान्स ऑफ डेमोक्रसी' या छायाचित्र प्रदर्शनाचं उदघाट्न झालं. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना राज ठाकरे यांनी वरील खळबळजनक दावा केला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या व्होटचोरी प्रकरणावरून सुरु झालेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर भाजपाकडून ▶▶ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.२१ऑक्टोबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


	किमान	कमाल	सरासरी
गहू: १.०० क्विंटल			
	२,६००	२,९००	२,७५०
ज्वारी/हायब्रिड: १०५.०० क्विंटल			
	४,४००	७,३००	५,४७१
मका/लोकल: १.०० क्विंटल			
	२,३००	२,३००	२,३००
तूर : १.०० क्विंटल			
	१०,०००	१०,०००	१०,०००
उडीद : १४.०० क्विंटल			
	९,६००	९,८५१	९,७३७
बाजरी: १६.५० क्विंटल			
	२,६००	३,०००	२,७३३
मुग: १.५० क्विंटल			
	८,५००	९,६९०	९,०५५
सोयाबीन: २६८.०० क्विंटल			
	६,५००	७,१७१	७,०१२
हरभरा: ७.५० क्विंटल			
	६,७००	७,६००	७,१३०

शिंदे साहेब तुमचं जरा चुकलंच!

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून एकनाथ शिंदेंच्या समर्थनार्थ झळकलेल्या खोचक बॅनरची जोरदार चर्चा

बीड । प्रतिनिधी

मराठा आरक्षण आणि मराठा समाजाशी संबंधित विविध निर्णयांवरून राजकीय वातावरण तापलेले असतानाच, एकनाथ शिंदे यांच्या समर्थनार्थ लावण्यात आलेला एक उपरोधिक (व्यंगात्मक) बॅनर सध्या राजकीय वर्तुळात आणि सोशल मीडियावर चांगलाच लक्षवेधी ठरत आहे. शिंदे साहेब तुमचं जरा चुकलंच! या ठळक शीर्षकाखाली लावण्यात आलेल्या या फलकावरून विरोधकांना आणि टीकाकारांना अत्यंत मार्मिक शब्दांत प्रत्युत्तर देण्यात आले आहे.



या फलकावर एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजासाठी आणि मराठवाड्यासाठी घेतलेल्या निर्णयांचा पाढा वाचताना खोचक शब्दांत 'तुमचं काय चुकलं?' असा उलट सवाल उपस्थित केला आहे. यावर लिहले आहे की, मराठवाड्यात गेल्या ४० वर्षांत केवळ २ हजार कुणबी प्रमाणपत्रे मिळाली होती, मात्र शिंदे यांनी अवघ्या दोन वर्षांत ३ लाख ५० हजार नोंदी व प्रमाणपत्रे शोधून दिली; त्यामुळे शिंदे साहेब खरंच तुमचं चुकलं! असा उपरोध व्यक्त केला आहे. मराठा समाजाला १० टक्के एसईबीसी आरक्षण दिले, ज्याचा लाभ मराठवाड्यातील ३ लाख ५० हजार विद्यार्थ्यांनी घेतला. अंतरवाली सराटी येथील सभेमुळे बाधित झालेल्या गरीब शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीपोटी १ कोटी ४३ लाख रुपयांची भरपाई देऊन शेतकऱ्यांचे अश्रू पुसले मराठा आंदोलनात बलिदान दिलेल्या आंदोलकांच्या कुटुंबीयांना थेट आर्थिक मदत आणि सरकारी नोकरी देण्याचा निर्णय घेतला. पदाचा प्रोटोकॉल बाजूला ठेवून समाजाच्या भावना समजून घेण्यासाठी स्वत: दोन वेळा उपोषणस्थळी जाऊन उपोषण सोडवले. ५,३०० मराठा तरुणांना अधिसंख्य पदे देऊन वर्ग-१ अधिकारी बनवले. बंद पडण्याच्या मार्गावर असलेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास ▶▶ पान २ वर

एसबीआयवर सायबर अटॅक खातेधारकांचे रेकॉर्ड्स धोक्यात

मुंबई । प्रतिनिधी

भारतीय स्टेट बँकेवर सायबर अटॅक झाला आहे. या माहितीला खुद्द एसबीआयने दुजोरा दिला आहे. एसबीआयच्या सर्व्हरवर सायबर अटॅक झाला असून, या अटॅकवेळी काही डेटा देखील चोरीला गेला आहे. बँकेने स्वत: सांगितले की, त्यांच्या ३९०० ग्राहकांची वैयक्तिक रेकॉर्डसची चोरी झाली आहे. जवळापस ४ हजार ग्राहकांची वैयक्तिक माहिती ही डार्क वेबवर शेअर करण्यात आली आहे. एसबीआयने सांगितलं की लीक डिटेल्समध्ये ग्राहकांचे नाव, फोन नंबर, आयडी आणि कर्जाचे डिटेल्स यांचा समावेश आहे. बँकेने या सायबर अटॅकमुळे त्यांच्या कोअर ऑपरेशनवर किंवा आर्थिक कामगिरीवर कोणताही परिणाम झालेला नाही असेक स्पष्ट केले आहे. एसबीआयने सांगितले की त्यांना सरकारी एजन्सीद्वारे हॅकिंगचा अलर्ट मिळाला आहे. यात थ्रेट हा इंटेलिजेन्स सर्व्हिस प्रोव्हायडर, डिफेन्स सायबर एजन्सी आणि इंडिया कम्युटर इमर्जनसी रिस्पोन्स टीम यांचा समावेश होता. सुरूवातीच्या तपासात जवळपास ३ लाख ७५ हजार रेकॉर्ड विश्लेषण करण्यात आले आहे.

अग्रलेख

दिशाहीन आर्थिक धोरण अन् वास्तवाचा आरसा

गेल्या काही वर्षांपासून भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे असा टिमकी वाजवणारा प्रचार केंद्रातील सत्ताधाऱ्यांकडून सातत्याने केला जात आहे. परंतु, घोषणांचे फुगे आणि वास्तवातील आकडेवारी यात किती प्रचंड तफावत आहे, याचा प्रत्यक्ष प्रत्यय २१ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या आर्थिक घडामोडींनी संपूर्ण देशाला आणून दिला आहे. एकाच दिवशी तीन मोठे आर्थिक धक्कादायक संकेत समोर आले–रिझर्व्ह बँकेने सरकारी कर्जाच्या २३,००० कोटी रुपयांच्या ट्रेझरी बिलांचा लिलाव पूर्णपणे रद्द केला, रुपयाची ऐतिहासिक घसरण कायम राहिली आणि शेअर बाजारात निफ्टी–सेन्सेक्सची लाल रंगात रंगाभरण झाली. नरेंद्र मोदी सरकारच्या नियोजनाचा नियोजन शून्य पॅटर्न आता देशाच्या तिजोरीला आणि सामान्य माणसाच्या खिशाला प्रत्यक्ष झळा पोहोचवू लागला आहे.

२१ ऑक्टोबर २०२६ रोजी रिझर्व्ह बँकेमार्फत ९१ दिवस, १८२ दिवस आणि ३६४ दिवसांच्या ट्रेझरी बिलांचा २३,००० कोटी रुपयांचा लिलाव होणार होता. परंतु, बँक आणि वित्तीय संस्थांकडून मागणीत आलेला परतावा सरकारच्या अटींपेक्षा खूप जास्त होता. गुंतवणूकदारांना स्पष्ट दिसत आहे की, वाढती महागाई आणि वित्तीय तूट यांमुळे भविष्यात व्याजाचे दर वाढणार आहेत. त्यामुळे त्यांनी जास्त व्याजदराची मागणी केली आणि रिझर्व्ह बँकेला सर्व बोली नाकाराव्या लागल्या. ही घटना साधी किंवा तांत्रिक नाही. जेव्हा बाजार सरकारला त्यांच्या इच्छित दराने कर्ज देण्यास नकार देतो, तेव्हा तो सरकारचा वित्तीय शिस्तीवरील आणि धोरणांवरील अविश्वास असतो. जर उद्या सरकारला चढ्या व्याजाने कर्ज घ्यावे लागले, तर तिजोरीवरील व्याजाचा बोजा वाढून आरोग्य, शिक्षण, शेती आणि पायाभूत सुविधांवरील निधीत थेट कपात होणार, हे स्पष्ट आहे. मोदी सरकारच्या धोरणांचा मुख्य गाभा इव्हेंट मॅनेजमेंट राहिलेला आहे. परंतु, अर्थशास्त्र हे हेडलाईन्सवर नव्हे तर आकडेवारीवर चालते. कच्चे तेल महाग झाल्यामुळे देशांतर्गत वाहतूक खर्च वाढतो आणि त्याचा फटका थेट भाजीपाला, अन्नधान्य आणि दैनंदिन वस्तूंच्या दरांना बसतो. मेक इन इंडिया आणि उत्पादन क्षेत्राला चालना देण्याच्या मोठमोठ्या घोषणांनंतरही प्रॉडक्शन लिंक्ड इन्सेंटिव्ह योजना रोजगार निर्मितीत अपयशी ठरल्याचे चित्र आहे. तरुणांना रोजगाराऐवजी कंत्राटी किंवा गिग वर्कवर ढकलले गेले आहे. महागाई आणि उत्पन्नातील संथ वाढीमुळे भारतीय कुटुंबांची निव्वळ आर्थिक बचत ही गेल्या अनेक दशकांतील नीचांकी पातळीवर पोहोचली आहे. लोकशाहीत जेव्हा एखादे सरकार सत्ता उपभोगते, तेव्हा अर्थव्यवस्थेच्या कामगिरीची जबाबदारीही त्याच सरकारची असते. रुपयाची घसरण झाली की आंतरराष्ट्रीय घडामोडी हे कारण सांगणे, शेअर बाजार घसरला की जागतिक मंदीची सावली असे स्पष्टीकरण देणे आणि सरकारी लिलाव फेल गेला की मौन बाळगणे–हे जबाबदार आर्थिक व्यवस्थापनाचे लक्षण नाही. सामान्य नागरिकासाठी अर्थव्यवस्था ही भाषणातील आकडेवारी किंवा जीडीपीची टक्केवारी नसते; ती त्याच्या महिन्याच्या बजेटवर ठरते. आजच्या घडीला महागाई वाढतेय, कर्जाचे हप्ते महाग होत आहेत आणि रुपयाचा अवमूल्यन रोखण्यात सरकार अपयशी ठरत आहे. २१ ऑक्टोबर रोजी घडलेला २३,००० कोटींच्या लिलावाचा फियास्को, रुपयाचा ढासळता स्तर आणि बाजारातील अस्वस्थता हा केंद्र सरकारसाठी धोक्याचा इशारा आहे. घोषणांचा पाऊस पाडून किंवा राजकीय भाषणबाजी करून बाजाराचा आणि देशाचा आत्मविश्वास जिंकता येत नाही. केंद्र सरकारने तात्काळ आपल्या दिशाहीन आर्थिक धोरणांचा फेरविचार करून, वित्तीय शिस्त पाळून आणि सामान्य माणसाला केंद्रात ठेवून ठोस निर्णय घेणे काळाची गरज आहे!

आदेशानंतरही माहिती नाही; आबा गर्जे यांचा आमरण उपोषणाचा इशारा

महासांगवी ग्रामपंचायतीच्या १५ व्या वित्त आयोगाच्या खर्चाची माहिती देण्यास टाळाटाळ; पंचायत समिती प्रशासनाविरोधात संताप

पाटोदा । प्रतिनिधी

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज करून तसेच प्रथम अपीलाचा स्पष्ट आदेश असतानाही माहिती उपलब्ध न करून दिल्याने महासांगवी (ता. पाटोदा) येथील अर्जदार गहिनाथ कांतीलाल गर्जे (आबा गर्जे) यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. येत्या सात दिवसांत संपूर्ण माहिती न मिळाल्यास पंचायत समितीसमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला असून, तसे लेखी निवेदन गटविकास अधिकारी (पाटोदा) यांना सादर केले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, महासांगवी ग्रामपंचायतीमार्फत १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून झालेल्या खर्चाबाबत गहिनाथ गर्जे यांनी माहिती अधिकारांतर्गत माहिती मागितली होती. परंतु, वेळेत माहिती न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले होते. या अपीलाच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक (श्री. राख व्ही. एस.) अनुपस्थित राहिले. सुनावणी दरम्यान सहायक गटविकास अधिकारी यांनी अर्जदाराने आवश्यक माहिती शुल्क भरल्यानंतर सात दिवसांच्या आत नियमानुसार संपूर्ण माहिती उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. मात्र, या आदेशालाही न जुमानता प्रशासनाने मुदतीत माहिती उपलब्ध करून दिली नाही. तत्काळ माहिती द्या: प्रथम अपीलाच्या आदेशानुसार १५ व्या वित्त आयोगाच्या निधीच्या खर्चाची संपूर्ण माहिती सात दिवसांत उपलब्ध करून द्यावी. विलंबाची कारणे स्पष्ट करा: माहिती देण्यास झालेल्या विलंबाचे लेखी कारण प्रशासनाने द्यावे. कारवाई करा: माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कारवाई करावी.आदेश देऊनही माहिती न देणे हा माहिती अधिकार कायद्याचा अवमान आहे. पुढील सात दिवसांत संपूर्ण माहिती न मिळाल्यास लोकशाही मार्गाने आमरण उपोषण केले जाईल. तसेच याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी (बीड) व राज्य माहिती आयोग (छत्रपती संभाजीनगर खंडपीठ) यांच्याकडे दाद मागणार आहे. या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी (बीड), मुख्य कार्यकारी अधिकारी (जि. प. बीड) आणि तहसीलदार (पाटोदा) यांना पुढील योग्य त्या कारवाईसाठी पाठवण्यात आल्या आहेत. प्रशासनाच्या या मनमानी कारभारामुळे महासांगवी परिसरात नागरिकांमधून तीव्र असंतोष व्यक्त केला जात आहे.

निद्रानाशावर मात करण्यासाठी नियमित दिनचर्या आणि शांत झोप आवश्यक-डॉ. जगदीश टेकाळे

बीड । प्रतिनिधी

शांत आणि पुरेशी झोप ही शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. झोप लागण्यास उशीर होणे, रात्री वारंवार जाग येणे किंवा पहाटे लवकर जाग येणे ही निद्रानाशाची लक्षणे आहेत. मानसिक ताण, चिंता, रात्री उशिरापर्यंत मोबाइलचा वापर, चहा–कॉफीचे अतिसेवन आणि अनियमित दिनचर्या यामुळे निद्रानाशाची समस्या उद्भवू शकते, असे मत मानसोपचारतज्ज्ञ डॉ. जगदीश श्रीराम टेकाळे यांनी व्यक्त केले.



निद्रानाशामुळे दिवसभर थकवा, सुस्ती, चिडचिड, एकाग्रतेचा अभाव तसेच स्मरणशक्ती आणि कार्यक्षमतेवर परिणाम होऊ शकतो. ही समस्या टाळण्यासाठी दररोज ठरावीक वेळी झोपणे व उठणे, प्रौढांनी सात ते नऊ तास झोप घेणे, झोपण्यापूर्वी मोबाइलचा वापर कमी करणे, संध्याकाळनंतर चहा–कॉफी टाळणे आणि नियमित चालणे किंवा हलका व्यायाम करणे आवश्यक आहे. ध्यान, संथ श्वसनाचा सराव तसेच शांत, अंधारमय आणि आरामदायक वातावरणात झोप घेणेही उपयुक्त ठरते. निद्रानाश दीर्घकाळ टिकत असल्यास किंवा दैनंदिन जीवनावर परिणाम होत असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. झोपेच्या गोळ्या अथवा आयुर्वेदिक औषधे स्वतःहून घेऊ नयेत, असे आवाहनही डॉ. टेकाळे यांनी केले. डॉ. जगदीश श्रीराम टेकाळे हे एम.बी.बी.एस., एम.डी. (मानसोपचार), गोल्ड मेडलिस्ट असून न्यूरोसायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती व सेक्सोलॉजी तज्ज्ञ आहेत. ते महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरातील साई, गावते कॉम्प्लेक्स, डी.पी. रोड, डॉक्टर लाइन, बसस्थानकाच्या पाठीमागे येथे रुग्णांसाठी उपलब्ध असतात. अधिक माहितीसाठी संपर्क : ९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२.

संस्कार भारती माजलगावचा शारदीय नवरात्र महोत्सव उत्साहात

माजलगाव । प्रतिनिधी

संस्कार भारती संयोजन समिती, माजलगाव यांच्या वतीने शारदीय नवरात्र महोत्सव २०२६ निमित्त आयोजित तीन दिवसीय सांस्कृतिक कार्यक्रम भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. दि.१७ ते १९ ऑक्टोबरदरम्यान झालेल्या या महोत्सवात संगीत भजन, पारंपरिक भूअलंकरण आणि कलावंतांचा सन्मान अशा विविध उपक्रमांतून भारतीय कला, संस्कृती आणि भक्तिपरंपरेचे दर्शन घडले. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी आयोजित संगीत भजन कार्यक्रमात शरयू शिंदे, मीनल पगारिया, चित्रा सोळंके, डॉ.श्रेया कुलकर्णी, कुणाल किशोर, दुर्गादास देशमुख आणि किशोर कुलकर्णी यांनी अभंग व आराधी गीतांचे सादरीकरण केले. 'माझी रेणुका माऊली', 'माय भवानी', 'गार डोंगराची हवा', 'आईचा जोगवा' आणि 'गेला हरी कुण्या गावा' या गीतांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. सुबोध देशपांडे यांनी तबल्याची, तर श्रीराम देशपांडे यांनी ढोलकीची साथ दिली. दुसऱ्या दिवशी श्री क्षेत्र मनुर येथे पारंपरिक भूअलंकरण कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये सुरेश देशपांडे, नंदिनी गर्गे, संगीता संदीकर आणि अपर्णा कुलकर्णी यांनी आकर्षक भूअलंकरण साकारले. या उपक्रमातून पारंपरिक लोककलेचा आणि भारतीय सांस्कृतिक परंपरेचा सुंदर आविष्कार पाहायला मिळाला. यावेळी संस्कार भारती देवगिरी प्रांताच्या अध्यक्षा श्रीमती पाठक, प्रांतमंत्री प्रमोद वझे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी श्री तुळजाभवानी मंदिर, कदमची देवी येथे भूअलंकरण कार्यक्रमाने महोत्सवाची सांगता झाली. यावेळी संस्कार भारती देवगिरी प्रांताच्या अध्यक्षा श्रीमती पाठक यांच्या हस्ते भूअलंकरण करणाऱ्या कलाकारांचा सन्मान करण्यात आला. तसेच माजलगावातील ज्येष्ठ साहित्यिक व कवयित्री प्रतिभा थिगळे यांनी लिहिलेल्या 'नवदुर्गा' या लेखाबद्दल त्यांचा विशेष गौरव करण्यात आला. या तीन दिवसीय महोत्सवाला संस्कार भारती देवगिरी प्रांताच्या अध्यक्षा श्रीमती पाठक आणि प्रांतमंत्री प्रमोद वझे यांची उपस्थिती लाभली. संस्कार भारती संयोजन समिती, माजलगावच्या पदाधिकारी व सदस्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. संगीत भजन, पारंपरिक भूअलंकरण आणि साहित्यिकांच्या सन्मानातून या महोत्सवाने भारतीय संस्कृती व भक्तिपरंपरेचा जागर केला. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देतानाच रसिकांना कला आणि संस्कृतीचा अविस्मरणीय अनुभव देणारा हा महोत्सव ठरला.

महायुतीचे सतीश चव्हाण हेच अभ्यासू आणि कार्यक्षम उमेदवार!

आ. सुरेश धस यांचा विश्वास; पदवीधर मतदार संवाद मेळाव्यात विजयाचा निर्धार

आष्टी । प्रतिनिधी

मराठवाडा विभाग पदवीधर मतदारसंघातील भारतीय जनता पार्टी, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महायुतीचे उमेदवार सतीश चव्हाण यांनी विधान परिषदेत गेल्या तीन टर्ममध्ये अभ्यासपूर्ण आणि कार्यक्षम कामगिरी केली आहे. पदवीधर, सुशिक्षित बेरोजगार, शिक्षक, शिक्षण संस्था आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यामुळे पदवीधर मतदारांनी सतीश भानुदासराव चव्हाण यांना पहिल्या पसंतीचे मत देऊन मोठ्या मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले.



आष्टी येथे आयोजित पदवीधर मतदार संवाद मेळाव्यात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी सभापती आदिनाथ सानप, आष्टी भाजपाध्यक्ष अनिल ढोबळे, रमेश गावडे, पाटोदा भाजपाध्यक्ष भागवत येवले, शिरूर कासार भाजपाध्यक्ष सुरेश उगलमुगले, अभियंता किशोर हंबर्डे, अतुल मेहेर, शिरूरचे नगराध्यक्ष गाडेकर आणि प्राचार्य विजय दानवे यांची उपस्थिती होती. आमदार धस म्हणाले की, सतीश चव्हाण यांची विधान परिषदेतील कामगिरी त्यांच्या अभ्यासपूर्ण मांडणीतून दिसून येते. वैद्यकीय शिक्षणातील प्रवेशासंदर्भातील मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र यांच्यातील ७०:३० टक्के आरक्षणाची अट रद्द करण्याच्या निर्णयाच्या प्रक्रियेत त्यांनी महत्त्वपूर्ण पाठपुरावा केला. पदवीधर मतदारसंघाचे कार्यक्षेत्र आठ जिल्हे आणि ७८ तालुक्यांमध्ये विस्तारलेले असल्याने प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचणे आव्हानात्मक आहे. मात्र, सतीश चव्हाण यांनी उपलब्धतेनुसार मतदारांच्या सुख–दुःखात सहभागी होत जनसंपर्क कायम ठेवला आहे. ते पुढे म्हणाले की, सतीश चव्हाण हे मराठवाडा शिक्षक प्रसारक मंडळाचे सचिव असून छत्रपती संभाजीनगर येथील त्यांचे कार्यालय सातत्याने कार्यरत असते. गेल्या काही वर्षांत त्यांनी पदवीधरांचे प्रश्न, सुशिक्षित बेरोजगारांच्या समस्या, शिक्षकांचे प्रश्न तसेच शैक्षणिक संस्था आणि त्यातील कर्मचाऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. निवडणुकीच्या काळात सोशल मीडियावर चुकीची माहिती आणि खोटे नॅरेटिव्ह पसरविण्याचे प्रकार होत असले, तरी मतदार सुज्ञ असून ते उमेदवाराचे काम आणि कार्यक्षमता पाहूनच निर्णय घेतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सतीश चव्हाण हे महायुतीचे अधिकृत उमेदवार असल्याचे स्पष्ट करून त्यांना विजयी करण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करून सतीश चव्हाण यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे, असेही आ. धस यांनी सांगितले. यावेळी प्राचार्य विजय दानवे म्हणाले की, आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांतील पदवीधर मतदार आमदार सुरेश धस यांच्या भूमिकेला महत्त्व देतात. त्यामुळे त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत सतीश चव्हाण यांना मोठ्या प्रमाणावर मतदान होईल आणि त्यांचा विजय निश्चित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. युवा कार्यकर्ते शेख समीर यांनी सुशिक्षित बेरोजगार पदवीधरांच्या अडचणी मांडल्या. लाडकी बहीण योजनेच्या धर्तीवर सुशिक्षित बेरोजगार पदवीधरांसाठीही आर्थिक अनुदानाची योजना सुरू करण्याची मागणी त्यांनी केली. कार्यक्रमाचे आभार सुरेश उगलमुगले यांनी मानले, तर सूत्रसंचालन ज्ञानेश्वर माऊली यांनी केले. यावेळी आष्टी तालुक्यातील विविध शिक्षण संस्थांचे शिक्षक, कर्मचारी, सुशिक्षित बेरोजगार आणि पदवीधर मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून...

नमो शेतकरी योजनेचे

सुमारे ३ हजार ७०० कोटी रुपयांचा निधी आवश्यक आहे. यासंदर्भातील प्रस्ताव मार्च आणि जुलै महिन्यात शासनाकडे पाठवण्यात आल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली आहे. मात्र, निधीला मंजुरी कधी मिळणार आणि शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे कधी जमा होणार, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. राज्यात या योजनेसाठी सुमारे ९२ लाख पात्र लाभार्थी असल्याचे सांगितले जात आहे. तथापि, आधार क्रमांक आणि बँक खात्याशी संबंधित त्रुटींमुळे प्रत्यक्ष लाभ मिळणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या कमी–अधिक होऊ शकते. त्यामुळे निधी मंजूर झाल्यानंतर लाभार्थ्यांची पडताळणी करून अनुदान वितरित करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. दुष्काळामुळे पिकांचे नुकसान, शेतीसाठी वाढलेला खर्च आणि उत्पन्नातील घट यांमुळे शेतकऱ्यांवरील आर्थिक ताण वाढला आहे. अशा परिस्थितीत रखडलेले चार हजार रुपये मिळाल्यास शेतकऱ्यांना दैनंदिन गरजा आणि शेतीचा खर्च भागवण्यासाठी काही प्रमाणात मदत होऊ शकते. त्यामुळे राज्य सरकारने निधी मंजुरीचा निर्णय लवकर घेऊन अनुदान वितरणाचे वेळापत्रक जाहीर करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

जातीपातीवर राजकारण

मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की आजची तरुण पिढी ही 'जेन–झी' असल्याचे सांगत त्या म्हणाल्या, स्वतःचा देश आणि घर जाळून आंदोलन करणारी तरुण पिढी आपल्याला नको आहे. जयप्रकाश नारायण यांच्या चळवळीत देशभक्ती रक्तात भिनलेले गोपीनाथ मुंडे यांच्यासारखे नेतृत्व देशाला पुढे नेण्यासाठी हवे आहे. अशा तरुण पिढीचे नेतृत्व करायचे असेल तर ते केवळ 'मुद्द्यांवरूनच' शक्य आहे. पुढे बोलताना पंकजा मुंडे यांनी महाराष्ट्र आणि बीड जिल्ह्यावर असलेल्या दुष्काळाच्या सावटावर गंभीर चिंता व्यक्त केली. राजकीय मतभेद बाजूला ठेवून आणि जातीपातीच्या भिंती तोडून सर्व अठरापगड जातींच्या लोकांनी या संकटाचा सामना करण्यासाठी एकजुटीने पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले. दुष्काळात जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून पाणी, चारा आणि आवश्यक मदतीसाठी आपण कटिबद्ध राहू, अशी ग्वाहीही त्यांनी या वेळी दिली. यापूर्वी माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी देखील समुदायाला मार्गदर्शन करताना सर्व समाजाने एक दिलाने राहण्याचे आवाहन केले आरक्षणासंदर्भात बोलताना त्यांनी शासनाने मराठा समाजाला जे शक्य आहेत ते दिले आहेत आणखीही वेगवेगळ्या मार्गाने देतच आहेत मात्र एखाद्याच्या ताटातले दुसऱ्याला दिले जाऊ नये मी गेली अनेक महिने शांत होतो काहीच बोललो नाही माझा दोष नसतानाही मला मीडिया ट्रायल केले गेले संत भगवान बाबा ची कृपा माझ्या पाठीशी आहे विद्यार्थी चळवळीपासून मी आरक्षणाचा पुरस्कर्ता आहे मात्र मलाच जाणीवपूर्वक रोल केले जाते अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

मराठा समाजाला विरोध करणाऱ्याला

तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी ठाम मागणी त्यांनी केली. मराठा समाजाच्या ५८ लाख नोंदी सापडल्या असून सर्वांना प्रमाणपत्रे व नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत, गेलेले आरक्षण तत्काळ रद्द करून हक्काचे आरक्षण द्यावे. जे कुणबीत गेले त्यांनी एसईबीसीतून आणि ज्यांचे एसईबीसी हुकले त्यांनी ईडब्ल्यूएसमधून लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले मारेकऱ्यांच्या दारात कटोरा घेऊन जायचे नाही. जो नेता किंवा पक्ष मराठ्यांच्या विरोधात भूमिका घेईल, त्याला २०२९ ला निवडून येऊ द्यायचे नाही, असा निर्धार करा, असे सांगत विरोध केल्याशिवाय सरकार काहीही देत नाही, असा इशारा त्यांनी दिला.मी हरलो तरी चालेल, पण माझा समाज जिंकला पाहिजे, हीच आपली भूमिका असून समाजातील तरुण–तरुणींनी उच्च शिक्षण घेऊन अधिकारी व नोकरदार बनावे, असा संदेश त्यांनी दिला.या ऐतिहासिक मेळाव्यास नारायणगडाचे मठाधिपती शिवाजी महाराज, बंकटस्वामी महाराज मठाचे प्रमुख लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्यासह प्रमुख संत–महंत आणि लाखो मराठा बांधव उपस्थित होते.

सीजेपीच्या आशुतोष रांका आणि सौरव दास

पोलिसांनी कोठडी वाढवण्याची विनंती केल्यानंतर, दंडाधिकाऱ्यांनी त्यांना आणखी दोन दिवस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले होते. जंतरमंतर येथे झालेल्या एका आंदोलनाच्या संदर्भात या दोन नेत्यांना ताब्यात घेण्यात आले होते. आरोपानुसार, निर्बंध लागू असतानाही त्यांनी बंद असलेले प्रवेशद्वार ओलांडून जंतरमंतर परिसरात प्रवेश केला. तिथे पोहोचल्यावर, त्यांनी आणि इतर सीजेपी कार्यकर्त्यांनी तिरंगा फडकवला आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. त्यानंतर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. १३ ऑक्टोबर रोजी त्यांना पाच दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. दिल्लीच्या विशेष कार्यकारी दंडाधिकारी न्यायालयाने सीजेपी नेते सौरव दास आणि आशुतोष रांका यांना पाच दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावून तिहार जेलमध्ये पाठवण्याचे आदेश दिले होते. या दोन नेत्यांवर यापूर्वी दिलेल्या जामीन बंधपत्रांच्या अटींचे उल्लंघन केल्याचा आरोप आहे. दरम्यान, याच प्रकरणात न्यायालयाने तिसरे नेते अजिक्य शिंदे यांना दिलासा देत, नवीन जामीन बंधपत्र भरून आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्याची परवानगी दिली.

---

५०० कोटींच्या आरोपांचा

यांच्यावर आरोप केले की, त्याला प्रसिद्धी दिली जाते. काही लोकांकडे ना गर्दी आहे, ना माणसे; त्यामुळे ते दुसऱ्यांवर बेछूट आरोप करतात, असा टोला नाव न घेता ठाकरे गटाला लगावला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी कलम ३७० हटविल्याचा उल्लेख करत शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावरही निशाणा साधला. 'सत्तापरिवर्तन घडविण्याचे ठरवणारे तुम्ही कोण? जनतेने तुम्हाला तीनदा नाकारले आहे. सत्तापरिवर्तनासाठी काम करावे लागते. घरात बसून काही होत नाही,' असेही ते म्हणाले. सत्तेसाठी अराजकता पसरवली जात असल्याचा आरोप करत शिंदे म्हणाले, 'हा हिंदुस्थान आहे. इथे लोकशाही आहे. सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढणाऱ्यांचा खरा चेहरा समोर आला आहे. हे लोक देश जोडायला नव्हे, तर तोडायला निघाले आहेत,' अशी टीकाही त्यांनी केली.

पुढील ४ महिन्यांमध्ये देशात काहीतरी

आंदोलन कर्त्या राजकिय विरोधकांना दबाव तंत्रांचा वापर करून आवाज दाबण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या धामधुमीत विद्यार्थी आणि राजकीय पक्षाचे कार्यकर्ते नेतेही या आंदोलनात भरभरून प्रतिसाद देत आहेत. या पार्श्वभूमीवर रेजिम चेंजचा विषय आला. त्यास विरोधकांबरोबर भाजपाच्या विरोधकांचाही मोठा प्रतिसाद मिळत आहे. त्यातच राज ठाकरे यांनी हे विधान केले आहे. शिवसेना उबाठाचे नेते तथा प्रवक्ते संजय राऊत यांनी केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांचा एपस्टीन फाईल्स प्रकरणातील प्रमुख आरोपी एपस्टीन यांच्यासोबत एकटेच चर्चा करताना दिसत आहेत, असा फोटो एक्सवर शेअर केला. त्यावरून राज ठाकरे यांना यासंदर्भात प्रश्न विचारला असता राज ठाकरे म्हणाले की, पुढील काळात खूप गोष्टी बाहेर येतील. सरकार चुकांवर चुका करत राहणार, आता हे थांबणार नसल्याचेही सांगत पुढील काही काळात संपूर्ण देश रस्त्यावर आला तरी मला आश्चर्य वाटणार नसल्याचेही यावेळी स्पष्ट केले. राज ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, काही महिन्यापूर्वी छएएढ परिक्षेच्या पेपरलीक वरून आंदोलन सुरु झाले. आता निवडणूक आयोगाच्या विषयावर आंदोलन सुरु झाले. नीट आंदोलनावेळी जी विद्यार्थी मुले रस्त्यावर उतरली त्यातील प्रत्येकजण काही विद्यार्थी नव्हता. पण त्यांच्या मनात कुठल्या ना कुठल्या गोष्टीचा राग होता. तो त्या माध्यमातून बाहेर आला. महाराष्ट्रातील आजची परिस्थिती पाहिली तर सरकारनेच ३०० हून अधिक तालुक्यात दुष्काळ जाहिर केला. पुढे आणखी परिस्थिती खराब होऊ शकते. अन्नधान्याची टंचाई निर्माण होऊ शकते असा अंदाजही राज ठाकरे यांनी व्यक्त केला. आणखी भीषण परिस्थिती येणार असल्याचे सांगत काही काळ छोटा काळ असेल पण देशाला पंतप्रधानच राहणार नाहीत. तसेच देशात सुरु असलेल्या आंदोलनावर भाजपाने अराजकतेचा आरोप केला. पोलिसांच्या कपड्यात तुम्ही तुमच्या पक्षाचे कार्यकर्ते घुसवले. तुम्ही हंगामा केला, आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी काहीच केलं नाही असेही यावेळी स्पष्ट केले. राज ठाकरे म्हणाले की, २०१८ पासून मी बॅलेटपेपरवर निवडणुका व्हाव्यात यासाठी प्रयत्न करतो आहे. त्यावेळी मी देशातील अनेक नेते आणि निवडणूक आयुक्तांनाही भेटलो होतो. त्यावेळी मी काय बोलतोय हे लोकांना कळालं नाही ते आता कळतंय. मतदानाच्या प्रक्रियेत पारदर्शकता असायला हवी. मी मतदान करतोय याचं समाधान मला असलं पाहिजे असेही यावेळी सांगितले. पुढे बोलताना राज ठाकरे म्हणाले की, जगातील बहुतांश पुढारलेल्या देशांमध्ये बॅलेट पेपरवर मतदान होतं. फ्रान्समध्ये एका मतदाराने तक्रार केल्यानंतर तिथली ईव्हीएम मशीन्स बंद करून बॅलेट पेपरवर मतदान सुरू झालं मग भारतात ईव्हीएम मशिन्स कशाला हव्यात? असा सवाल केला. राज ठाकरे म्हणाले की, अमेरिकेतील कलाकार राष्ट्राध्यक्षांविषयी मत मांडतात म्हणून लगेच त्यांच्या चित्रपटांवर बहिष्कार घातला जात नाही. आपल्याकडे त्याच भीतीने अनेक कलाकार बोलत नाहीत.

टायगर श्रॉफ गोळीबार प्रकरण

आलेल्या आरोपींची नावे आहेत. दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने दिलेल्या माहितीनुसार, कुणाल नुकताच जामिनावर तुरुंगातून बाहेर आला होता. हरसाना गावातील एका मित्राने त्याची ओळख अनिल पंडितशी करून दिली. अनिल पंडित हा मूळचा पानिपतचा असून, तो सध्या अमेरिकेतून गुन्हेगारी कारवाया चालवतो. तो लॉरेन्स बिश्नोई टोळीचा साथीदार असल्याचे मानले जाते. कुणालने त्यानंतर एका मेसेजिंग पद्धारे पंडितशी संवाद साधण्यास सुरुवात केली, असे अधिकाऱ्याने सांगितले. दरम्यान, या चौघा आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले. त्यानंतर मुंबई पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण विभागाने (सीआयडी) त्यांना ताब्यात घेण्यासाठी आणि अधिकृतपणे अटक करण्यासाठी न्यायालयात अर्ज केला. न्यायालयाने हा अर्ज मंजूर करून मुंबई पोलिसांच्या पथकाला तीन दिवसांची ट्रान्झिट रिमांड दिली.

शिंदे साहेब तुमचं

महामंडळाच्या १० लाखांच्या कर्ज मर्यादेत वाढ करून ती १५ लाख केली आणि लाखो तरुण उद्योजक घडवले. 'सारथी' संस्थेला हजारो कोटींचा निधी देऊन आयएएस, आयपीएससह शेकडो वर्ग–१ दर्जाचे अधिकारी घडवले; तसेच पुण्यात मुख्य कार्यालयासह नाशिक, कोल्हापूर, नागपूर, लातूर आणि नवी मुंबई येथे विभागीय कार्यालये व वसतिगृहे उभारली. बॅनरच्या शेवटी अत्यंत तिखट शब्दांत निशाणा साधत लिहिले आहे की, एवढं करूनही शिंदे साहेब खरंच तुमचं चुकलं! ४ चार राजकीय सर्टिफिकेटसाठी, तुमचा बाजार उठवतो... ही भाषा...? एकूणच, समाजात शिंदेंविषयी केल्या जाणाऱ्या राजकीय टीकेला आणि वापरल्या जाणाऱ्या भाषेला उत्तर देण्यासाठी, त्यांनी केलेली कामे 'चूक' ठरवण्याचा हा उपरोधिक मार्ग सध्या राजकीय वर्तुळात कौतुकाचा तसेच जोरदार चर्चेचा विषय बनला आहे.

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि.२२ ऑक्टोबर २०२६
३

थोडक्यात



ओंकार चे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांची गेवराईतील किसान अर्बन ला सदिच्छा भेट

गेवराई । प्रतिनिधी

अल्पावधीतच काळामध्ये साखर उद्योगांमध्ये आपले नाव लौकिक करणाऱ्या ओंकार साखर कारखाना उद्योग समूहाचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी गेवराई येथील किसान अर्बन को ऑफ क्रेडिट गेवराई च्या मुख्य शाखेस सदिच्छा भेट दिली यावेळी संस्थेच्या वतीने संस्थेचे चेअरमन महेश बेदरे यांनी शेतकऱ्यांच्या वतीने यावेळी त्यांचा येतोचित सत्कार केला.

साखर उद्योगाच्या माध्यमातून राज्यभरामध्ये शेतकऱ्यांना ओंकार साखर कारखान्याच्या माध्यमातून उच्चकी दर देऊन शेतकऱ्यांना सुगीचे दिवस आणणाऱ्या ओंकार शुगर ने राज्यभरात २७ साखर कारखाने घेतले असून बीड जिल्ह्यातील परळी पांगरी येथिल वैद्यनाथ साखर कारखाना जालना जिल्ह्यातील भोकरदन येथील रामेश्वर साखर कारखाना चालवत असून बीड जिल्ह्यातील बहुचर्चित कुटे तिरूमला उद्योग समूह नुकताच खरेदी केला असून यामुळे बीड लोकांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत मराठवाड्यातील गोदाकाट च्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ओंकार साखर कारखान्यामुळे चांगला दर तर मिळणार आहेच भविष्यातील अतिरिक्त उसाचा प्रश्न ही सुटणार आहे याच निमित्ताने ओंकार साखर उद्योग समूहाचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी गेवराई येथील उद्योजक महेश बेदरे यांच्या किसान अर्बनला भेट देऊन डिसेंबर मध्ये होणाऱ्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या पत्रिकेचे प्रकाशन बोत्रे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधला भविष्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कसलीही अडचण येऊन देणार नाही अशी ग्वाही यावेळी बोत्रे पाटील यांनी दिली याप्रसंगी किसान अर्बन चे चेअरमन महेश बेदरे, शिवनेरी अर्बनचे चेअरमन संजय जाधव यांच्या सह गेवराई परिसरातून आलेले शेतकरी यावेळी उपस्थित होते बोत्रे पाटील यांनी दिलेल्या सदिच्छा भेटीतून आगामी काळातील येणाऱ्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ग्रुपच्या माध्यमातून नक्कीच शेतकऱ्यांना फायदा होईल असा विश्वास शेतकऱ्यांनी व्यक्त केला.

रब्बी ज्वारीच्या प्रमाणित बियाण्यांसाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

रब्बी हंगाम सन २०२६-२७ अंतर्गत 'राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण उप अभियान- पौष्टिक तृणधान्य ' योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रब्बी ज्वारी पिकाचे प्रमाणित बियाणे ५० टक्के अनुदानावर वितरित केले जाणार आहे. याशिवाय शेतकरी गटांसाठी १०० टक्के अनुदानावर पीक प्रात्यक्षिके घटक राबविण्यात येणार असून, या दोन्ही घटकांचे लक्षांक महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र शेतकरी व शेतकरी गटांनी याचा लाभ घेण्यासाठी लवकरात लवकर अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी एस. एम. साळवे यांनी केले आहे. ङ्अनुदानाचे स्वरूप प्रमाणित बियाणे वितरण (वैयक्तिक शेतकरी): १० वर्षा आतील वाणांसाठी रु. ३०/- प्रति किलो व १० वर्षावरील वाणांसाठी रु. १५/- प्रति किलो प्रमाणे अनुदान दिले जाईल. पीक प्रात्यक्षिके (शेतकरी गट): बियाणे घटकाचा लाभ शेतकरी गटांना १०० टक्के अनुदानावर दिला जाईल. ङ्गयाशिवाय एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, एकात्मिक कीड व्यवस्थापन आणि शेतकरी प्रशिक्षणही राबविण्यात येणार असून, यासाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. ङ्गइच्छुक व पात्र शेतकऱ्यांनी महाडीबीटीच्या ाहरवर्ली.ाहरीरीहीर.सीं.ळप (किंवा थेट शेतकरी लॉगिन www.mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/-griLogin) या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन अर्ज करावा. योजनेबाबत अधिक माहितीसाठी कृषी विभागाचे संके तस्थळ www.krishi.maharashtra.gov.in तसेच संबंधित कृषी सहाय्यक, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही कृषी विभागा मार्फत कळविण्यात आले आहे.

दसऱ्याच्या सणात पाटोदेकरांवर 'रिमगा' करण्याची वेळ!

८० कोटींची पाणीपुरवठा योजना रखडली; १८ महिन्यांची मुदत उलटूनही काम अपूर्ण!

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील नागरिकांना मुबलक आणि नियमित पाणीपुरवठा व्हावा, या अपेक्षेने नगरोत्थान योजनेंतर्गत सुमारे ८० कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना हाती घेण्यात आली. तलाव लाजेश्वर येथून पाणीपुरवठा करण्याच्या या महत्त्वाकांक्षी योजनेचे काम १८ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, निर्धारित मुदत उलटूनही योजनेचे काम पूर्ण झाले नसल्याने या योजनेच्या कार्यक्षमतेबाबत आणि कामाच्या प्रगतीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. दसऱ्यासारख्या सणाच्या काळातही या योजनेचा प्रश्न कायम असल्याने पाटोदेकरांवर आनंदोत्सवाऐवजी 'शिमगा' करण्याची वेळ आल्याची संतप्त भावना व्यक्त होत आहे.पाटोदा शहराच्या पाणीप्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा निघेल, नियमित पाणीपुरवठा होईल आणि नागरिकांची पाण्यासाठी होणारी धावपळ कमी होईल, अशी अपेक्षा या योजनेतून व्यक्त करण्यात आली होती. सुमारे ८० कोटी रुपयांच्या खर्चाची ही योजना शहरासाठी महत्त्वाची मानली जाते. मात्र, काम निर्धारित वेळेत पूर्ण न झाल्याने नागरिकांच्या अपेक्षांवर पाणी फिरल्याची भावना निर्माण झाली आहे१८ महिन्यांची मुदत; मग काम पूर्ण का नाही? कोट्यवधी रुपयांची योजना राबविताना कामाचे नियोजन, वेळापत्रक आणि त्यावर देखरेख ठेवणे अत्यंत महत्त्वाचे असते. १८ महिन्यांत काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असताना निर्धारित मुदतीत योजना पूर्ण का झाली नाही, हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. कामात विलंब होण्यामागे नेमकी कोणती कारणे आहेत? तांत्रिक अडचणी आहेत का? प्रशासकीय दिरंगाई झाली आहे का? की कामाच्या नियोजनात त्रुटी राहिल्या? या प्रश्नांची अधिकृत उत्तरे नागरिकांना मिळणे आवश्यक आहे.योजनेची मुदत संपल्यानंतरही काम अपूर्ण असेल, तर संबंधित यंत्रणेने याबाबत स्पष्ट भूमिका मांडली पाहिजे. काम किती पूर्ण झाले, किती काम बाकी आहे आणि ते पूर्ण करण्यासाठी आणखी किती कालावधी लागणार आहे,याची माहिती सार्वजनिक केल्यास नागरिकांमधील संभ्रम दूर होऊ शकतो.८० कोटींचा खर्च,पण पाटोदेकरांची प्रतीक्षा कायम! पाणी ही नागरिकांची मूलभूत गरज आहे. शहरातील पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी मोठ्या खर्चाची योजना राबविली जात असेल, तर तिचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांना वेळेत मिळणे अपेक्षित असते. केवळ योजना मंजूर होणे किंवा काम सुरू होणे पुरेसे नाही; तर योजनेचे काम पूर्ण होऊन प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू होणे महत्त्वाचे आहे.८० कोटींच्या या योजनेचा अपेक्षित लाभ पाटोदा शहरातील नागरिकांना नेमका कधी मिळणार, हा प्रश्न आता ऐणीवर आला आहे. योजनेवर झालेला खर्च, कामाची सद्यस्थिती,उर्वरित काम आणि पाणीपुरवठा सुरू करण्याची तारीख याबाबत संबंधित प्रशासनाने सविस्तर माहिती द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.दसऱ्याचा आनंद की रखडलेल्या कामाचा संताप? दसरा हा आनंद, उत्साह आणि विजयाचे प्रतीक मानला जाणारा सण आहे. मात्र,शहराच्या विकासाशी संबंधित महत्त्वाची योजना निर्धारित मुदतीत पूर्ण होत नसेल, तर नागरिकांच्या मनात नाराजी निर्माण होणे स्वाभाविक आहे.सणासुदीच्या काळात विकासकामांचा आढावा घेताना केवळ घोषणांपेक्षा प्रत्यक्ष कामाची प्रगती महत्त्वाची ठरते.पाटोदा शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्याच्या उद्देशाने हाती घेतलेली योजना वेळेत पूर्ण झाली असती, तर नागरिकांना दिलासा मिळाला असता. मात्र, मुदत उलटूनही काम अपूर्ण असल्याने 'दसऱ्याच्या सणात पाटोदेकरांवर शिमगा करण्याची वेळ' अशी बोचरी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

पाणी कधी मिळणार

पाटोदा शहरातील नागरिकांना या योजनेतून नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठा कधी सुरू होणार, हा मुख्य प्रश्न आहे.८० कोटी रुपयांच्या योजनेचा अपेक्षित लाभ प्रत्यक्षात मिळण्यासाठी आता ठोस कार्यवाहीची गरज आहे. केवळ आश्वासने किंवा कागदोपत्री प्रगती नको, तर काम पूर्ण होऊन नागरिकांना प्रत्यक्ष दिलासा मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे१८ महिन्यांची मुदत ८० कोटींची योजना आणि तरीही अपूर्ण काम या परिस्थितीचे उत्तर प्रशासनाने द्यावे. पाटोदेकरांना नियमित पाणीपुरवठ्याचा लाभ कधी मिळणार आणि रखडलेली योजना पूर्ण करण्यासाठी कोणती ठोस पावले उचलली जाणार, याकडे आता शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

प्रशासन आणि संबंधित यंत्रणेने उत्तर द्यावे! या योजनेच्या विलंबाबाबत संबंधित प्रशासनाने पुढाकार घेऊन नागरिकांसमोर वस्तुस्थिती मांडणे गरजेचे आहे. कामाचा विलंब नेमका कशामुळे झाला, त्यासाठी जबाबदार कोणती यंत्रणा आहे आणि पुढील कार्यवाहीचे नियोजन काय आहे,हे स्पष्ट झाले पाहिजे.तसेच उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी निश्चित कालमर्यादा जाहीर करून त्यानुसार काम पूर्ण करण्यावर भर देणे आवश्यक आहे.

नागरिकांच्या मूलभूत गरजांशी संबंधित योजना राबविताना पारदर्शकता आणि उत्तरदायित्व असणे गरजेचे आहे. त्यामुळे या योजनेच्या कामाचा आढावा घेऊन प्रगती अहवाल सार्वजनिक करावा आणि काम पूर्ण होण्याच्या तारखेबाबत स्पष्ट माहिती द्यावी, अशी मागणी पुढे येत आहे.

पाटोदा तालुक्यात वाघाचा वावर! ट्रॅप कॅमेऱ्यात छायाचित्र कैद

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील धस पिंपळगाव आणि सगळेवाडी परिसरात वन विभागाच्या वतीने लावण्यात आलेल्या ट्रॅप कॅमेऱ्यामध्ये वाघ हा प्राणी स्पष्टपणे ट्रॅप (कैद) झाला आहे. या वाघाचा सध्याचा वावर नायगाव मयूर अभयारण्याच्या आसपासच्या क्षेत्रात असल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

वन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, या भागातील वन्यजीवांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी ट्रॅप कॅमेरे बसवण्यात आले होते. त्यापैकी एका कॅमेऱ्यात वाघाचे छायाचित्र समोर आले आहे. सध्या हा वाघ नायगाव मयूर अभयारण्य परिसरात फिरत असल्याने प्रशासनाने तातडीने उपाययोजना आखण्यास सुरुवात केली आहे.

शेतकरी व ग्रामस्थांसाठी वन विभागाचे महत्त्वाचे आवाहन:

वन विभागाने परिसरातील सर्व शेतकरी, शेतमजूर आणि नागरिकांना नम्र विनंती व सतर्कतेचा इशारा दिला आहे:

रात्री-अपरात्री शेतात जाणे टाळा: रात्रीच्या वेळी किंवा भल्या पहाटे एकटे शेतात अथवा निर्मनुष्य ठिकाणी जाऊ नये.

अडचणीच्या ठिकाणी झोपू नये: शेतात काम करताना अथवा दिवसा विश्रांती घेताना झाडी-झुडपांच्या, ओढ्याकाठी किंवा अडचणीच्या सुरक्षित नसलेल्या ठिकाणी झोपू नये.

शेतात काम करताना काळजी घ्या: शेतीची कामे करताना योग्य ती खबरदारी बाळगावी, शक्यतो दोन-तीन जणांनी एकत्र काम करावे व सोबत काठी ठेवावी.

संशयित हालचाली आढळल्यास संपर्क साधा: परिसरात वाघ किंवा इतर हिंस्र श्वापदाचा वावर आढळल्यास तात्काळ वन विभागाशी संपर्क साधावा, कोणत्याही परिस्थितीत प्राण्याला छेडण्याचा अथवा त्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करू नये.

वन विभागाचे पथक या परिसरात गस्त घालत असून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. नागरिकांनी घाबरून न जाता आवश्यक ती सर्व खबरदारी बाळगावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.



धस पिंपळगाव, सगळेवाडी परिसरात भीतीचे सावट नायगाव मयूर अभयारण्य परिसरातील शेतकऱ्यांना सतर्कतेचा इशारा

पान ६ वरून...

प्रवासात चोरी करणारी महिला

ही धडक कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, पोलीस उपअधीक्षक राजीव नवले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार सोमनाथ गायकवाड, स्वाती मुंडे, विकास राठोड, पोलीस अंमलदार आशपाक सय्यद, मनोज परजणे, बबन सलगर तसेच चालक पोलीस हवालदार नितीन वडमारे यांच्या पथकाने केली आहे.

नारायणगड, भगवान भक्तीगडावर

यावेळी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नारायणगड व भगवान भक्तीगड ही धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व असून, लाखो भाविकांच्या श्रद्धेचे ते केंद्र आहेत. या दोन्ही पवित्र श्रद्धास्थळांवर नतमस्तक होत डॉ.क्षीरसागर यांनी संत -महंतांचे आशीर्वाद घेतले.

स्नेह मिलन उत्साहात

विजयादशमीच्या मंगलमय पर्वानिमित्त भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या वतीने आयोजित दसरा स्नेह मिलन सौ.के.एस.के. महाविद्यालयात उत्साहात पार पडले. या स्नेह मिलनाच्या निमित्ताने स्नेह, आपुलकी आणि बंधुभावाचे वातावरण निर्माण झाले. दरवर्षीप्रमाणे यंदाही विजयादशमीच्या शुभपर्वावर सर्वांना एकत्र आणणाऱ्या या उपक्रमातून सामाजिक जिव्हाळा जपण्याचा प्रयत्न करण्यात आला.

बीड जि. प. प्राथमिक

कलम ७(१) चा भंग झाल्यामुळे कलम २०(१) व कलम १९(८)(क) अन्वये राज्य माहिती आयुक्त (छत्रपती संभाजीनगर खंडपीठ) श्री. प्रकाश इंदलकर यांनी २०,००० रुपयांचा अंतिम दंड ठोठावला आहे. अर्ज दाखल असलेल्या कालावधीत जबाबदार असलेल्या जन माहिती अधिकाऱ्याचे नाव निश्चित करून, सदर दंडाची रक्कम त्यांच्या वेतनातून वसूल करून शासकीय लेखाशीर्षात जमा करावी, असे निर्देश जिल्हा परिषद बीडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले आहेत. तसेच, सध्याच्या जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस तात्काळ माहिती उपलब्ध करून द्यावी, हा निर्णयही कायम ठेवण्यात आला आहे.

दुष्काळाच्या संकटात हतबल

जीवांचे संरक्षण करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घ्यावा. पाणी, चारा आणि अन्य आवश्यक बाबींचे नियोजन करताना सामूहिक जबाबदारीची जाणीव ठेवावी, असेही त्यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शेतकऱ्यांच्या पाठीशी!

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी आवश्यक प्रयत्न केले जातील, असा विश्वास व्यक्त करत आमदार धस म्हणाले की, संकटाच्या काळात शेतकऱ्यांनी आणि नागरिकांनी हतबल होण्याची गरज नाही. शासन आणि लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून गरजूंपर्यंत मदत पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले जातील.

दुष्काळाच्या संकटाला घाबरून जायचे नाही, तर एकजुटीने त्याचा मुकाबला करायचा आहे. अडचणीच्या काळात संयम सोडू नका. भावनेच्या भरात कोणताही चुकीचा निर्णय घेऊ नका. संकट कितीही मोठे असले, तरी आपण एकमेकांच्या पाठीशी उभे राहिलो, तर त्यातून मार्ग नक्कीच निघेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

संकटात एकटे पडू नका; मदतीसाठी संपर्क साधा!

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांनी धैर्य राखणे, परिस्थितीचा विचारपूर्वक सामना करणे आणि टोकाचे पाऊल टाळणे अत्यंत गरजेचे आहे. कोणत्याही अडचणीत नागरिकांनी एकटे पडू नये, त्यांना मदतीचा आधार मिळावा आणि संकटातून बाहेर पडण्यासाठी आवश्यक सहकार्य मिळावे, यासाठी आपण २४ तास उपलब्ध असल्याचे आमदार सुरेश धस यांनी आश्वस्त केले.

एक फोन सुरेश धस यांना करा; मदतीसाठी मी २४ तास तत्पर आहे, या त्यांच्या आवाहनातून दुष्काळाच्या संभाव्य संकटात शेतकरी व नागरिकांना धीर देण्याचा आणि त्यांच्यामध्ये विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न दिसून आला. दुष्काळाशी लढताना केवळ शासनाच्या मदतीवर अवलंबून न राहता प्रत्येकाने काटकसर, नियोजन, परस्पर सहकार्य आणि संवेदनशीलतेची भूमिका स्वीकारली, तर संकटाची तीव्रता कमी करण्यासाठी निश्चितच हातभार लागू शकतो, हा संदेश या दसरा मेळाव्यातून देण्यात आला.

बीड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या

रामनगरचा प्रवास आणि वाहतूक खर्च वाचण्यास मदत होत आहे. बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतमालाची आवक, तोलमाप, खुला लिलाव, दैनंदिन बाजारभाव, परवाना व नियमन व्यवस्था तसेच त्वरित देयकासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. बाजार आवारात पिण्याचे पाणी, साठवणूक आणि लिलावासाठी जागेसह मूलभूत सुविधाही उपलब्ध आहेत. रेशीम कोषासाठी स्वतंत्र बाजारपेठ उपलब्ध झाल्याने उत्पादकांना स्पर्धात्मक दर मिळण्यास मदत होत आहे. या कार्याची दखल घेत सौ.सरला मुळे यांची 'मराठवाडा सहकार आयकॉन पुरस्कार २०२६'साठी निवड करण्यात आली असून, त्यांच्या निवडीचे बीड जिल्ह्यातील कृषी व सहकार क्षेत्रातून स्वागत होत आहे.

राज्यस्तरीय स्पर्धेत आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांचे यश; मिरर कोडमध्ये अरबाज शेख प्रथम

बीड । प्रतिनिधी

बार्शी येथील भगवंत इन्स्टिटच्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे आयोजित राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये बीडच्या आदित्य पॉलिटेक्निक च्या विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याचा ठसा उमटवत उज्वल यश संपादन केले. या स्पर्धेत कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग व इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी विभागातील शेख अरबाज मुस्तफा याने अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या मिरर कोड प्रोग्राम स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला, तर पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत प्रिती राऊत, शर्वरी गर्जे व सलोनी गायकवाड यांच्या गटाने तृतीय क्रमांक पटकावून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

यशस्वी विद्यार्थांचे अभिनंदन आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा आणि संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी केले. १० ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत भगवंत इन्स्टिटच्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बार्शी येथे तांत्रिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विविध नामांकित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने भाग घेतला होता. आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयातील ६ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यामध्ये प्रिती दत्ता राऊत, सलोनी धर्मराज गायकवाड, शर्वरी बळीराम गर्जे, पल्लवी महादेव यादव, साक्षी नवनाथ रोहिटे आणि अरबाज मुस्तफा शेख यांनी प्रा. मिन्हाज शेख यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेत सहभाग घेतला.

या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपले तांत्रिक ज्ञान, कल्पकता, सादरीकरण कौशल्य आणि कोडिंगमधील क्षमता प्रदर्शित करण्याची उत्कृष्ट संधी मिळाली. विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांशी शैक्षणिक संवाद साधल्यामुळे नवीन तंत्रज्ञान शिकण्याचा एक वेगळा अनुभव विद्यार्थ्यांना मिळाला.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल आदित्य शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा आणि आदित्य पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. राहुल खडके यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना विभागप्रमुख प्रा. सलीम शेख व प्रा. मिन्हाज शेख यांचे मार्गदर्शन लाभले. या यशामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास द्विगुणित झाला असून तांत्रिक क्षेत्रातील आगामी स्पर्धांसाठी मोठी प्रेरणा मिळाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

बेरोजगारी, आर्थिक विषमता आणि शैक्षणिक बाजारीकरण यावर सभागृहात भाष्य करणारा आमदार निवडून द्यावा-घोलप

पाटोदा । प्रतिनिधी

मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदारांनी आपले मागासलेपण, बेरोजगारी, आर्थिक विषमता दूर करण्यासाठी, शिक्षणाचे बाजारीकरण रोखण्यासाठी, मराठवाड्याला आत्महत्येचा लागलेला कलंक पुसण्यासाठी आपल्या उच्चशिक्षित मताच्या माध्यमातून आपण सभागृहात बोलणाऱ्या प्रतिनिधींना आपल्या मताची पहीली, दुसरी व तीसरी पसंती द्याल असे परखड मत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना शेकापचे भाई विष्णुपंत घोलप यांनी व्यक्त केले. आज समाजात श्रीमंत आणि गरीबांची दरी खुप मोठी झाली आहे.



येणाऱ्या काळात याचा केव्हा स्फोट होईल हे सांगणे कठीण आहे. त्याचप्रमाणे बेरोजगारीला वेळीच लगाम घातला नाही तर याचा विपरित परिणाम सर्व समाज घटकावर होईल. तसेच निवडणूक आयोगाच्या उदासिनते मुळे मराठवाड्यात किमान दहा लाखांपेक्षा जास्त पदवीधर असताना फक्त तीन लाख बावीस हजार मतदार अस्तित्वात आहेत त्यात बीड जिल्हात सुमारे एक लाखाच्या पुढे पदवीधर असुन आठ्ठावनहजार पदवीधर मतदारांची नोंद आहे. हि उदासिनता लोकशाहीला पोशख नसल्याचे मत या वेळी भाई विष्णुपंत घोलप यांनी व्यक्त केले. या वेळी पुढे बोलताना भाई विष्णुपंत घोलप म्हणाले की शासनाने शेवटच्या श्रेणीतील कर्मचाऱ्या इतका पगार, दर दिवस रोजगार हमी वर काम करणाऱ्या मजुरांना दिला तर आपणाला नव्वद टक्के पदवीधर रोजगार हमी योजनेच्या कामावर दिसतील.

नवसाला पावणाऱ्या चिंचवणच्या जगदंबा देवीच्या यात्रेला भाविकांची मांदियाळी!

२५ ऑक्टोबरला पालखी मिरवणूक; २६ ऑक्टोबरला महाराष्ट्रातील नामवंत पैलवानांच्या जंगी कुस्त्यांचा थरार

वडवणी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यात असलेल्या चिंचवण येथील नवसाला पावणारी जगदंबा देवी हजारो भाविकांचे श्रद्धास्थान बनली आहे. ऐतिहासिक वारसा, प्राचीन मंदिर आणि रामायणकालीन आख्यायिकांशी जोडलेले धार्मिक महत्त्व यामुळे चिंचवणच्या जगदंबा देवीची ख्याती जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचली आहे. देवीच्या यात्रेनिमित्त परिसरात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, भाविकांना यात्रेची उत्सुकता लागली आहे.

पालखी मिरवणूक आणि जंगी कुस्त्यांचे आयोजन

चिंचवण येथील जगदंबा देवीच्या यात्रेनिमित्त रविवार, दिनांक २५ ऑक्टोबर २०२६ रोजी देवीच्या पालखीची मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्यानंतर सोमवार, दिनांक २६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २ते ५ या वेळेत भव्य जंगी कुस्त्यांच्या दंगलीचे आयोजन करण्यात आले आहे.

या कुस्ती दंगलीसाठी महाराष्ट्रातील नामवंत आणि उत्कृष्ट कुस्तीपटू पैलवान उपस्थित राहणार असून, त्यांच्या डावपेचांचा थरार कुस्तीप्रेमींना अनुभवता येणार आहे. या यात्रेमुळे धार्मिक उत्सवाबरोबरच पारंपरिक कुस्ती संस्कृतीला प्रोत्साहन मिळणार आहे. डोंगरपट्ट्यातील तसेच वडवणी तालुक्यासह परिसरातील सर्व नागरिकांनी देवीच्या यात्रेला आणि जंगी कुस्त्यांना मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

ऐतिहासिक आणि धार्मिक वारशाची समृद्ध परंपरा

चिंचवण गावाला ऐतिहासिक आणि धार्मिक वारसा लाभला आहे. रामायणकालीन कथांशी या परिसराचा संबंध जोडला जातो. प्रचलित आख्यायिकांनुसार, रावणाने सीतेचे अपहरण केल्यानंतर राम-लक्ष्मणांच्या शोधमोहिमेशी संबंधित कथा या भागात सांगितल्या जातात. तसेच मकरध्वज आणि हनुमान यांच्या युद्धाची कथाही या परिसराशी जोडली जाते. या



स्थानिक आख्यायिकांमुळे चिंचवणच्या धार्मिक महत्त्वात भर पडली आहे. गावातील जगदंबा देवीचे प्राचीन मंदिर भाविकांसह इतिहासप्रेमींचेही लक्ष वेधून घेते. मंदिरातील दगडी बांधकाम, कोरीव खांब आणि पारंपरिक वास्तुरचना या परिसराच्या ऐतिहासिक वैभवाची साक्ष देतात. देवीच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या श्रद्धेने येतात. नवरात्रोत्सव आणि यात्रेच्या काळात मंदिर परिसरात विशेष उत्साह पाहायला मिळतो.

नवसपूर्तीच्या श्रद्धेने भाविकांची गर्दी

जगदंबा देवी नवसाला पावते, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

मनोकामना पूर्ण होण्यासाठी अनेक भाविक देवीला नवस बोलतात, तर नवस पूर्ण झाल्यानंतर कृतज्ञतेपोटी देवीच्या दर्शनासाठी येतात. श्रद्धा, भक्ती, परंपरा आणि ऐतिहासिक वारसा यांचा संगम चिंचवणच्या जगदंबा मंदिरात पाहायला मिळतो.

प्राचीन मंदिराच्या संवर्धनाची गरज

चिंचवण येथील जगदंबा मंदिराला धार्मिक महत्त्वासोबतच ऐतिहासिक वारसाही लाभला आहे. या प्राचीन वास्तूचे जतन व संवर्धन करून मंदिर परिसराचा नियोजनबद्ध विकास करणे आवश्यक आहे. संबंधित प्रशासन आणि पुरातत्त्व विभागाने मंदिराच्या ऐतिहासिक महत्त्वाची पाहणी करून आवश्यक ती कार्यवाही केल्यास या देवस्थानाची ओळख अधिक व्यापक होऊ शकते. त्यामुळे भाविकांसह इतिहासप्रेमी आणि पर्यटकांनाही या ठिकाणाकडे आकर्षित करता येईल.

श्रद्धा आणि परंपरेचा उत्सव!

नवसाला पावणारी जगदंबा देवी, प्राचीन मंदिराचा वारसा, पालखी मिरवणूक आणि महाराष्ट्रातील नामवंत पैलवानांच्या जंगी कुस्त्या यामुळे चिंचवणची यात्रा यंदाही विशेष आकर्षण ठरणार आहे. या धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळ्यात सहभागी होण्यासाठी परिसरातील भाविक, ग्रामस्थ आणि कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन यात्रा कमिटीने केले आहे.

रब्बी ज्वारीच्या बियाणे खरेदीवर सरकारकडून मिळणार ५० टक्के अनुदान

पुणे / वृत्तसंस्था

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण उप अभियानांतर्गत सन २०२६-२७ च्या रब्बी हंगामात ज्वारीच्या बियाण्यांवर अनुदान मिळणार आहे. यात पात्र शेतकऱ्यांना बियाणे खरेदीवर ५० टक्के अनुदान मिळणार आहे. तर, १० वर्षांच्या आतील वाणांसाठी प्रति किलो ३० रुपयांपर्यंत अनुदान मिळते. तसेच, १० वर्षांपेक्षा जुन्या वाणांसाठी प्रति किलो १५ रुपयांपर्यंत अनुदान मिळणार आहे. त्याचबरोबर, पीक प्रात्यक्षिकासाठी शेतकरी गटांना १०० टक्के अनुदानावर ज्वारीचे बियाणे दिले जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांचा बियाणे खरेदीचा खर्च कमी होण्यास सरकारकडून मदत मिळणार आहे.

योजनेचा उद्देश : रब्बी ज्वारी बियाणे अनुदान योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना चांगल्या दर्जाचे प्रमाणित बियाणे उपलब्ध करून देणे हा आहे. ज्वारीचे उत्पादन वाढवणे, नवीन आणि सुधारित वाणांचा वापर करण्यास प्रोत्साहन देणे, तसेच बियाणे खरेदीचा खर्च कमी करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करणे, हे या योजनेचे प्रमुख उद्देश आहेत. याशिवाय, पीक प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे, हेदेखील या योजनेचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

योजनेचे फायदे : या अभियानाद्वारे शेतकऱ्यांना आधुनिक शेती पद्धतींची माहिती दिली जाणार आहे. पिकांचे योग्य व्यवस्थापन करता यावे आणि



शेतीचे उत्पादन वाढण्यास मदत व्हावी, यासाठी एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, एकात्मिक कीड व्यवस्थापन, शेतकरी प्रशिक्षण आणि जिल्हास्तरीय कृषी महोत्सव असे विविध उपक्रम देखील राबवले जाणार आहेत.

योजनेच्या अटी : अनुदान फक्त रब्बी ज्वारीच्या प्रमाणित बियाण्यासाठी दिले जाईल. लाभ महाडीबीटी पोर्टलद्वारेच ऑनलाइन पद्धतीने मिळतो. वैयक्तिक शेतकऱ्यांसाठी 'प्रमाणित बियाणे वितरण' घटक निवडावा लागेल. शेतकरी गटांसाठी 'पीक प्रात्यक्षिके' घटक निवडावा लागेल. १० वर्षांआतील वाणांसाठी प्रति किलो रु. ३० आणि १० वर्षांवरील वाणांसाठी प्रति किलो रु. १५ एवढे अनुदान असणार आहे. अनुदानाची रक्कम उपलब्ध लक्षांक, बियाण्याची किंमत व शासकीय निर्णयानुसार निश्चित होईल. अर्ज केल्यानंतरच लाभार्थी निवड व बियाणे वाटप केले जाईल. अर्जात दिलेली जमीन, बँक व ओळखीची माहिती अचूक असणे आवश्यक आहे. चुकीची माहिती दिल्यास अर्ज रद्द होऊ शकतो.

योजनेची पात्रता : अर्जदार महाराष्ट्रातील शेतकरी असावा. अर्जदाराच्या स्वतःच्या नावाने शेतजमीन असावी. अद्ययावत सातबारा व ८-अ उतारा असावा. आधार कार्डशी जोडलेला सक्रिय मोबाइल नंबर असावा. शेतकऱ्याच्या नावाचे बँक खाते असावे. महाडीबीटी पोर्टलवर फार्मर आयडी व नोंदणी असणे आवश्यक आहे. रब्बी ज्वारी पिकाची लागवड करणारा शेतकरी असावा. शेतकरी गटांसाठी - पीक प्रात्यक्षिके घटक. अर्जदार पात्र शेतकरी गट असावा. गटाची योग्य नोंदणी व संबंधित कागदपत्रे असावीत. प्रात्यक्षिकासाठी निवडलेले क्षेत्र व पीक योजनेच्या अटींनुसार असावे. गटाचे बँक खाते व आवश्यक अधिकृत माहिती असावी.

आवश्यक कागदपत्रे : आधार कार्ड, सातबारा उतारा, ८-अ उतारा, बँक पासबुक, आधारशी जोडलेला मोबाइल नंबर असणे महत्त्वाचे. महाडीबीटी फार्मर आयडी आवश्यक. शेतकरी गटासाठी गटाची नोंदणी व संबंधित कागदपत्रे. आवश्यक असल्यास स्वयंघोषणापत्र

अर्ज प्रक्रिया : सर्वप्रथम महाडीबीटीच्या अधिकृत वेबसाइटवर जा. फार्मर आयडी आणि मोबाईलवर आलेला ओटीपी टाकून लॉगिन करा. तुमची वैयक्तिक माहिती, जमिनीची माहिती, बँक खाते आणि आवश्यक कागदपत्रे पूर्ण करा. घटकासाठी अर्ज करा' या पर्यायावर क्लिक करा. वैयक्तिक शेतकऱ्यांनी 'प्रमाणित बियाणे वितरण', तर शेतकरी गटांनी 'पीक प्रात्यक्षिके' हा पर्याय निवडा. रब्बी हंगाम, ज्वारीचे पीक आणि उपलब्ध बियाण्यांचा वाण निवडा. त्यानंतर आवश्यक माहिती भरा. सर्व माहिती तपासून शुल्क भरुन अर्ज सादर करा.



महत्वाच्या घटना

४००४ ई. पू. : उस्शेर कालक्रमानुसार सुमारे संध्याकाळी सहा वाजता जग तयार केले गेले.
१६३३ : लियाओउलू उपसागाराची लढाई: मिंग राजघराण्याने डच ईस्ट इंडिया कंपनीला पराभूत केले.
१७९७ : बलूनमधून १००० मीटर उंच जाऊन पॅराशूटच्या साहाय्याने आंद्रे जॅक्स गार्नेरिन जमिनीवर उतरणारा पहिला मानव बनला.
१९२७ : निकोला टेस्ला यांनी सिंगल-फेज इलेक्ट्रिकसह सहा नवीन शोध लावले.
१९३८ : चेस्टर कार्लसनने जगातील पहिले झेरॉक्स मशिन तयार केले.
१९६३ : पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते भाक्रा धरण राष्ट्राला अर्पण करण्यात आले.
१९६४ : फ्रेन्च लेखक, कवी आणि तत्त्वज्ञ जेआँ-पॉल सार्त्र यांना नोबेल पुरस्कार मिळाला पण त्यांनी तो नाकारला.
१९९४ : भारतीय उद्योगपती नवीनभाई सी. दवे यांना ब्रिटनच्या महाराणी एलिझाबेथ यांचा उद्योग व शिक्षण क्षेत्रातील कार्याबद्दल कोट ऑफ आर्म्स पुरस्कार जाहीर.
२००१ : ग्रँड थेफ्ट ऑटो ३ हा वीडीओ गेम प्रकाशित झाला.
२००८ : भारताने पहिल्या मानवविरहित चांद्रयान-१ चे प्रक्षेपण केले.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६८९ : पोर्तुगालचा राजा जॉन (पाचवा) यांचा जन्म. (मृत्यू: ३१ जुलै १७५०)
१८७३ : अमृतानुभवी संत तीर्थराम हिरानंद गोसावी ऊर्फ स्वामी रामतीर्थ यांचा जन्म. (मृत्यू: १७ ऑक्टोबर १९०६)
१९०० : भारतीय स्वातंत्र्यसैनिक अश्फाकुला खान यांचा जन्म. (मृत्यू: १९ डिसेंबर १९२७)
१९४२ : आंतरराष्ट्रीय ख्यातीचे छायाचित्रकार रघूवीर सिंह यांचा जन्म. (मृत्यू: १८ एप्रिल १९९९ न्यूयॉर्क)
१९४७ : भारतीय वंशाचे अमेरिकन डॉक्टर व लेखक दीपक चोप्रा यांचा जन्म.
१९४८ : इंग्लंडचा गोलंदाज माईक हेंड्रिक यांचा जन्म.
१९८८ : भारतीय अभिनेत्री परिणीती चोप्रा यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१७ : इंडियन जर्नल ऑफ मेडिकल रिसर्चचे संस्थापक चार्ल्स पार्डे ल्यूकिस यांचे निधन.
१९३३ : थोर देशभक्त बॅ. विठ्ठलभाई पटेल यांचे निधन. (जन्म: १८ फेब्रुवारी १८७१)
१९७८ : साहित्यिक व वक्ते नारायण सीताराम तथा ना. सी. फडके यांचे निधन. (जन्म: ४ ऑगस्ट १८९४)
१९९१ : देहदान चळवळीचे पुरस्कर्ते व देहदान सहाय्यक मंडळाचे संस्थापक ग. म. सोहोनी यांचे निधन.
१९९८ : हिंदी चित्रपटांतील खलनायक अजित खान ऊर्फ अजित यांचे निधन. (जन्म: २७ जानेवारी १९२२)
२००० : अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे प्रमुख कार्यवाह, सामाजिक कार्यकर्ते व उद्योगपती अशोक मोतीलाल फिरोदिया यांचे निधन.
२०१४ : भारतीय दिग्दर्शक आणि सिनेमॅटोग्राफर अशोक कुमार यांचे निधन.

वाण निवडीपासून ते काढणीपर्यंत संपूर्ण मार्गदर्शक: गहू लागवड



गहू हे सर्वात महत्वाचे पीक आहे व भारतात मोठ्या प्रमाणात पीक घेतले जाते. तसेच गहू लागवड योग्य प्रकारे करण्यासाठी खालीलप्रमाणे टप्प्याटप्प्याने नियोजन करावे:

जमीन आणि हवामान : जमीन: मध्यम ते भारी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी आणि ६.५ ते ७.५ सामू (कि) असलेली जमीन योग्य ठरते. हवामान: थंड आणि कोरडे हवामान आवश्यक असते.

लागवडीची वेळ : बागायती (वेळेवर): १ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर. उशिरा लागवड: १५ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर

सुधारित वाण (जाती) : बागायती (वेळेवर): फुले समाधान (छख-थ-१९९४), एचडी-२१८९, एमएसीएस-६२२२, त्र्यंबक, गोदावरी. जिरायती: पंचवटी, नेट्रावती, एनआयएडब्ल्यू-१४१५ (एमएसीएस-६४७८).

बियाण्याचे प्रमाण आणि बीजप्रक्रिया : बियाणे: बागायती वेळेवर पेरणीसाठी १०० किलो प्रति हेक्टरी; उशिरा पेरणीसाठी १२५ ते १५० किलो प्रति हेक्टरी. बीजप्रक्रिया: पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २.५ ग्रॅम थिरम किंवा कॅप्टन लावावे. त्यानंतर २५ ग्रॅम झोटोबॅक्टर आणि २५ ग्रॅम पी.एस.बी. (झइइ) जिवाणू संवर्धनाची प्रक्रिया करावी.

पेरणीची पद्धत : दोन ओळींमधील अंतर २० सेमी (उशिरा पेरणीसाठी १८ सेमी) आणि दोन रोपांमधील अंतर ५ ते ७ सेमी ठेवावे.

बियाणे ४ ते ५ सेमी खोल पेरावे.

खत व्यवस्थापन (प्रति हेक्टरी) : बागायती (वेळेवर): १२० किलो नत्र, ६० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश. पेरणीच्या वेळी: नत्राचा अर्धा हप्ता (६० किलो) + संपूर्ण स्फुरद (६० किलो) + संपूर्ण पालाश (४० किलो) द्यावे. उरलेला नत्राचा अर्धा हप्ता (६० किलो): पेरणीनंतर २१ ते ३० दिवसांनी (पहिल्या पाण्यानंतर) द्यावा.

पाणी व्यवस्थापन (महत्त्वाचे टप्पे) : गव्हाला एकूण ५ ते ६ वेळेस पाणी द्यावे लागते: मुकुटमुळे फुटण्याची वेळ: २१ ते २५ दिवस. फुटवे येण्याची वेळ: ४० ते ४५ दिवस. गाठ पडण्याची वेळ: ६० ते ६५ दिवस. फुलोऱ्याची वेळ: ७५ ते ८० दिवस दाण्यात दूध भरण्याची वेळ: ९० ते ९५ दिवस. दाणे पक्के होण्याची वेळ: १०० ते १०५ दिवस.

थंडीत शेळ्यांची काळजी; कोणताही आजार होणार नाही

भारतात शेळीपालनाला मोठं महत्व आहे. अनेक जण शेतळीपालनच्या माध्यमातून यशस्वी व्यवसाय करत आहेत आणि महिन्याला लाखो रुपये कमवत आहेत. परंतु शेळीपालन व्यवसाय हा दिसतोय तेवढा सोप्पा सुद्धा नक्कीच नाही.. शेळ्यांची एखाद्या लहान मुलाप्रमाणे काळजी घ्यावी लागते, त्यांना जपावं लागते. काय हवं नको ते बघावं लागते. शेळ्या निरोगी असतील तरच तुमचा व्यवसाय वाढणार आहे. कारण निरोगी आणि मजबूत शेळ्या अधिक दूध देतात, जलद वाढतात आणि आजारी पडण्याची शक्यता कमी असते. त्यातच सध्या थंडीचा सीजन सुरु झाला आहे. थंडीत अनेकदा शेळ्यांच्या मृत्यूचे प्रमाण वाढते. अशावेळी नेमकी कोणती खबरदारी घ्यावी? कशाप्रकारे शेळ्यांची काळजी घ्यावी हे लक्षात घेतले तर याबाबात चांगले नियोजन करता येते.

थंडीमध्ये शेळ्यांची काळजी घेण्यासाठी, त्यांचे थंड वारा गारठा आणि ओलाव्यापासून संरक्षण करा. शेळ्यांच्या गोठ्यात उबदार आणि कोरडे वातावरण कसे राहील याकडे लक्ष्य द्या. त्यांना पुरेसे आणि पौष्टिक अन्न द्या आणि पिण्यासाठी गोठलेले नसलेले पाणी उपलब्ध करून द्या. थंडीत त्यांच्या आरोग्यासाठी योग्य निवारा, हवा खेळती राहील अशी व्यवस्था करा. गोठ्यात पुरेसा



नैसर्गिक प्रकाश आणि ऊन येईल याकडे लक्ष्य द्या. थंडीमुळे शेळ्यांच्या मृत्यूचे प्रमाण वाढू शकते, त्यामुळे त्यांच्या आरोग्याकडे बारकाईने लक्ष द्या तसेच काही आजार आढळल्यास तात्काळ उपचार करा

शेळ्यांचे आरोग्य आणि उत्पादकता पूर्णपणे त्यांच्या आहारावर अवलंबून असते. प्रथिने, जीवनसत्त्वे, खनिजे, फायबर आणि पाण्याचा संतुलित आहार शेळ्यांची वाढ जलद होते, अधिक दूध देते आणि आजारी पडण्याची शक्यता कमी असते. त्यामुळे शेळ्यांच्या वाढीसाठी, दूध उत्पादनासाठी आणि गर्भधारणेसाठी प्रथिने हे सर्वात आवश्यक पोषक तत्व आहे. हिरवा चारा, कडधान्ये, सोयाबीन आणि अल्फल्फा हे प्रथिनांनी समृद्ध असतात. प्रथिनांची कमतरता शेळ्यांना कमकुवत करू शकते, दूध उत्पादन कमी करू शकते आणि त्यांची वाढ मंदावू शकते. जीवनसत्त्वे आणि खनिजे शेळीच्या शरीराच्या प्रत्येक कार्याला आधार देतात. कॅल्शियम आणि फॉस्फरस हाडे मजबूत करतात, मॅग्नेशियम आणि लोह स्नायू आणि रक्तासाठी आवश्यक आहे, तर जीवनसत्त्वे अ, ड आणि ई रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. यातील कमतरतेमुळे वारंवार आजार होतात आणि वासरे कमकुवत होतात.

आणखी एक महत्वाची बाब म्हणजे पाण्याचा अभाव पाण्याअभावी शेळ्यांचे शरीर जास्त गरम होते, त्यांची पचनसंस्था कमकुवत होते आणि दुधाचे उत्पादन कमी होते. उन्हाळ्यात अधिक वारंवार आणि जास्त प्रमाणात पाणी द्यावे, तर हिवाळ्यात नियमित, हलके पाणी पुरेसे असते. सोडियम किंवा मीठ ऊर्जा पातळी राखते आणि तहान भागवते. जर शेळ्यांना पुरेसे मीठ मिळाले नाही तर त्या सुस्त आणि कमकुवत होतात. पुरेसे मीठ सेवन शेळ्यांना सक्रिय आणि निरोगी ठेवते. शेळ्यांच्या पचनसंस्थेसाठी फायबर आवश्यक आहे. हिरवा चारा, गवत आणि सायलेज पचन सुधारते, बद्धकोष्ठता टाळते आणि शरीराला पोषक तत्वे योग्यरित्या शोषण्यास मदत करते. चांगल्या दर्जाचे गवत दिवसातून दोनदा द्यावे जेणेकरून शेळ्या निरोगी आणि मजबूत राहतील.

पावसाळा संपताच फळबागांना करून घ्या काव पेस्ट

यंदा भरपूर पाऊस झाल्याने शेतकरी चिंतेत आहेत. ज्यांच्या फळबागा आहेत त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. आता पाऊस उघडला असला तरी फळबागेतील झाडांना खोड कीड, वाळवी लागू नये म्हणून खबरदारी घेणे गरजेचे आहे. काव पेस्ट यासाठी महत्वाची असून, ती कधी लावावी तसेच बाजरात कोणकोणत्या काव पेस्ट उपलब्ध आहेत याबाबत माहिती असणे गरजेचे आहे.



काव पेस्ट म्हणजे काय? : झाडाच्या खोडाला कीड किंवा वाळवी लागू नये तसेच तीव्र उन्हापासून खोडाचे रक्षण व्हावे म्हणून खोडाला एक पेस्ट लावली जाते. तांबड्या किंवा पांढऱ्या रंगाच्या या पेस्टलाच काव पेस्ट असे म्हणतात. अलीकडे बाजारात तयार काव पेस्ट सुद्धा उपलब्ध आहे.

काव पेस्ट कशी बनवतात? : अनेकदा पैशांची बचत करण्यासाठी शेतकरी घरच्या घरी काव पेस्ट बनवतात. काव पेस्ट बनवण्यासाठी खालील साहित्य वापरतात. एका बादलीमध्ये किंवा हौदात हे साहित्य टाकून ते २४ तास भिजत ठेवावे लागते. यानंतर पेस्ट झाडांना ब्रशच्या साहाय्याने लावली जाते.

साहित्य : वीस किलो खडा काऊ. २०० ग्रॅम खडा हिंग. दोनशे ग्रॅम कापूर. दोनशे ग्रॅम डांबर गोळी. हे सगळे २४ तास भिजत घाला व त्यानंतर २०० एम एल हमला औषध याच्यामध्ये मिक्स करून झाडांना ब्रेस्टच्या साह्याने पेस्टिंग करून घ्यावी.

काव पेस्टचे प्रकार : काव पेस्ट घरात बनवता येतेच पण बाजारात तयार काव पेस्टसुद्धा मिळते. काव पेस्टचे तीन प्रकार आहेत. घरी बनवलेली काव पेस्ट, तयार काव पेस्ट, स्प्रे काव पेस्ट. तुमची झाडे मोठी असतील तर स्प्रे काव पेस्ट वापरल्याने वेळेची बचत होते.

काव पेस्ट लावण्याचे फायदे : फळबागेसह सर्वच मोठ्या झाडांना काव पेस्ट लावण्याचे खूप फायदे आहेत. अनेकदा खोडकीड, वाळवी यामुळे झाडांचे फार नुकसान होते. त्यामुळे वेळीच उपाययोजना केल्या तर होणारे नुकसान टाळता येऊ शकते. काव पेस्ट लावल्याने तीव्र उन्हामध्ये झाडाचे उन्हापासून बचाव होतो.

काव पेस्ट केव्हा लावावी? : काव पेस्ट पावसाळा संपला कि लगेच लावावी. तसेच दर वर्षी फेब्रुवारी महिन्यात काव पेस्ट लावावी. एका वर्षात किमान दोन वेळा काव पेस्ट लावणे गरजेचे आहे. जमिनीपासून साधारणपणे ३ फूट उंचीपर्यंत खोडाला ब्रशच्या साहाय्याने पेस्ट लावावी. तसेच जिथे नवीन फांद्या फुटल्यात अशा ठिकाणी काही अंतरापर्यंत पेस्टींग करावे.

संत्रा-मोसंबी बागा वाचवण्यासाठी हे उपाय करून बघा

ऑक्टोबर हीटमध्येच दुष्काळाच्या झळा अनेक भागांना बसत आहेत. संत्रा मोसंबीच्या बागांमधील ओलावा कमी होऊन फळगळतीचे प्रमाण वाढते. बागा सुकतात आणि झाडं मरतात. यामुळे उत्पादनात घट येते आणि शेतकरी आर्थिक संकटात सापडतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी पाण्याची कमतरता वेळीच लक्षात घेऊन फळबागांना विश्रांती, आच्छादन, सिंचनाच्या विविध पद्धती, केओलिनच्या फवारण्या, बोर्डो मिश्रणांचा अवलंब करावा.

ओलावा टिकवण्यासाठी हे करा :फळबागेच्या जमिनीतील पाण्याचे बाष्पीभवन कमी करण्यासाठी विविध प्रकारच्या आच्छादनाचा वापर करावा. आच्छादनामुळे पाण्याचे बाष्पीभवन टाळता येते. सेंद्रिय आच्छादनामुळे जमिनीची सुपीकता वाढते तसेच पाणी धारण करण्याची क्षमता वाढते. त्यामुळे झाडाच्या खाली ४ ते ६ इंच सेंद्रिय आच्छादनाचा जसं, कुटार, पालापाचोळा, वाळलेले गवत, यांचा वापर करावा. संत्रा वर्गीय फळ पिकामध्ये जमिनीतील बाष्पीभवन आणि तणांचे नियंत्रण करण्याकरिता विडमॅटचा वापर करावा. लिंबूवर्गीय फळझाडाच्या जमिनीची वेळोवेळी चाळणी करुन बाष्पीभवन वेग कमी करावा.

बहारांचे नयोजन आणि छाटणी :दुष्काळी परिस्थितीत फळांचे उत्पादन घेण्यापेक्षा झाडे कशी जगवता येतील यावर भर द्यावा. त्यामुळे पाण्याची उपलब्धता कमी असलेल्या परिस्थितीत फळबागांचे



संरक्षण करण्यासाठी झाडावरील फळांचा भार कमी करावा. झाडावरच्या अनावश्यक फांद्या, पाने, वाळलेल्या, रोगट आणि आडव्या फांद्या छाटाव्यात. यामुळे झाडावरील पानांची संख्या कमी होऊन पाण्याचा उपयोग कमी होतो. तसेच पानांतून होणारे बाष्पीभवनसुद्धा कमी होते. बहाराचे व्यवस्थापन करावे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. नवीन झाडे असतील तर अशा ठिकाणी आच्छादन करावे. झाडे १० ते १५ लिटर पाण्यावर जगू शकतात. झाडावर कोणताही बहर घेऊ नये. तसेच झाडावर फळे नसावीत.

सिंचनाच्या विविध पद्धती :त्यासाठी शक्यतो फळबागांना पारंपरिक पद्धतीपेक्षा ठिबक सिंचन पद्धतीने सिंचन करावे. यामुळे पाण्याचा अपव्यवय टाळता येतो. झाडांना पाणी सहसा सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळेला द्यावे. दुपारी जास्त तापमानामुळे पाण्याची वाफ होते आणि त्या वाफेमुळे फळगळ होण्याची शक्यता असते. झाडाला पाणी देताना झाडाच्या खोडाला पाण्याचा स्पर्श होणार नाही, संपर्क होणार नाही याची काळजी घ्यावी. पाण्याच्या संपर्कने जोडीवरील सालीवर डिंक्या रोग येण्याची जास्त शक्यता असते. यासाठी ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करावा. नवीन कलमाच्या भोवती एक मडके जमिनीत अर्ध्या भागापर्यंत पुरुन ठेवावे. त्यामुळे पाणी टाकून ठेवल्यास एक आठवडाभर ते पाणी पुरु शकते. लहान झाडं जगविण्यासाठी सलाईनच्या जुन्या किंवा रिकाम्या प्लास्टिकच्या बाटलीचा वापर करावा. ही पद्धत केवळ फळबागांची लहान रोपं, शेताच्या बांधावर लावलेल्या झाडांसाठी उपयुक्त ठरते. मोठ्या प्रमाणावर पसरलेल्या पिकासाठी वापरता येत नाही. नवीन कलमा भोवती बोरुचे बी गोलाकार पेरावे. झाडांना पाणी देताना बोरुचे बी त्या पाण्यावर रुजून वाढल्यावर झाडाचे जास्त तापमानापासून संरक्षण करते.

उष्णतेचा ताण कमी करण्यासाठी : संत्रा मोसंबी व कागदी लिंबी या झाडांच्या खोडांना जमिनीपासून तीन फूट उंचीपर्यंत बोर्डोपेस्ट लावावी. त्यामुळे खोडावर पडणारा सूर्यप्रकाश परावर्तित होऊन झाडाचे जास्त तापमानापासून संरक्षण होईल. जास्त उष्णता आणि कमी पाण्यात फळझाडांनी तग धरण्यासाठी ८ टक्के केओलिन किंवा १-१.५ टक्के पोटॅशिअम नायट्रेट यांचा फवारणीसाठी वापर करावा. साधारण १५ ते २० दिवसांच्या अंतराने अशा दोन फवारण्या शेतकऱ्यांनी कराव्या. बागेभोवती वारा प्रतिबंधक कुंपण करावे.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
गुरूवार दि. २२ ऑक्टोबर २०२६ ५


बनावट एचएसआरपी नंबर प्लेट बनवुन देणाऱ्या आरोपीसह चोरीच्या मोटारसायकल जप्त

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्हयात मोटार सायकल चोरी करणाऱ्या इसमांचा शोध घेवुन मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत मा. पोलीस अधिक्षक श्री तेघबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या, त्याअनुशंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना मोटार सायकल चोरी करणाऱ्या आरोपीतांचा शोध घेवुन गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना देवून मार्गदर्शन केले होते.

दिनांक १८/१०/२०२६ रोजी मोटार सायकल चोरी करणाऱ्या आरोपीतांचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, इसम नामे १) शेख राजेक शेख मुबारक, वय २६ वर्ष, रा. संजयनगर जालना याने त्याच्या ताब्यातील होंडा शाईन मोटार सायकलला बनावट नंबर प्लेट लावलेली आहे.

त्यानुषंगाने त्याचा शोध घेतला असता तो भवानीनगर, जालना परिसरात मिळुन आल्याने त्याच्या ताब्यातील होंडा शाईन मोटार सायकलवरील नंबर प्लेट व मोटार सायकलचा इंजिन व चेसीस क्रमांकाची पडताळणी केली असता ते वेगवेगळे असल्याचे दिसुन आले.



त्यामुळे सदरची नंबर प्लेट कोणी बनवुन दिली याबाबत विचारणा केली असता त्याने सांगितले की, सदरची नंबर प्लेट रॉयल रेडीयम, जालना चा मालक इसम नामे २) शेख परवेज शेख गणी, वय ३६ वर्ष, रा. शेरसवारनगर, जालना व एस.एन. टेक्नोलॉजी, विशाल कॉर्नर, जालना चा मालक इसम ३) राहुल पंढरीनाथ मुनेश्वर, वय ४० वर्ष, रा. सुंदरनगर, चंदनझिरा जालना यांनी बनवुन दिली असल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांनाही ताब्यात घेवुन त्यांच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने विचारणा केली असता त्यांनी मोटार सायकलबाबत कोणतेही कागदपत्रांची शहानिशा न करता व नंबर प्लेट बनविण्याचा कोणताही अधिकृत परवाना नसतांना स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी बनावट नंबर प्लेट बनवुन दिल्याचे कबुल केले. त्यामुळे आरोपीतांच्या ताब्यातुन रु.३,३६,८५०/- किंमतीचे एक मोटार सायकल व नंबर प्लेट बनविण्याचे मशिन व साहित्य जप्त करण्यात आले असुन तीनही आरोपीविरुध्द कदीम पोलीस ठाणे जालना येथे संगनमत करुन बनावट नंबर प्लेट बनवुन सरकारची फसवणुक केल्यामुळे गु.र.क्र.६०२/२०२६ कलम ३१८, ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच आरोपी शेख राजेक शेख मुबारक, वय २६ वर्ष रा. संजयनगर जालना यास सदरची मोटार सायकल ही कोणाकडुन घेतल्याबाबत विचारणा करता त्याने सदरची मोटार सायकल ही आरोपी नामे १) सैय्यद अल्ताफ सैय्यद अहेमद, वय-२४ वर्ष, रा. नॅशनलनगर, जालना व २) विधीसंघर्षग्रस्त बालकाकडुन सन २०२४ मध्ये विकत घेतल्याचे सांगितले आहे. त्यांना ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्यांनी सदरची मोटार सायकल सन २०२४ मध्ये राजुर, जालना येथून चोरी केली असल्याचे सांगितले असुन सदर घटनेच्या अनुषंगाने हसनाबाद पोलीस ठाणे जालना येथे गु.र.क्र. १४८/२०२४ कलम ३७९ भा.द.वि. अन्वये गुन्हा दाखल असल्याचे दिसुन आले आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. तेघबीर सिंह संधू , मा. अपर पोलीस अधिक्षक डॉ. विक्रम साळी , मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, पोउपनि, श्री. राजेंद्र वाघ व पोलीस अंमलदार रमेश राठोड, प्रभाकर वाघ, सागर बावीस्कर, दत्ता वाघुंडे, बावा गायकवाड, शिवप्रसाद एखंडे, रमेश काळे, वसंत धस, धिरज भोसले, सुनिल पवार, अशोक जाधवर सर्व स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी केली आहे.

विजयादशमी दसरानिमित्त मोहटादेवी गडावर शस्त्रपूजन



पाथर्डी। प्रतिनिधी

श्री क्षेत्र मोहटादेवी गडावर दसऱ्यानिमित्त देवस्थान समितीचे विश्वस्त बाबासाहेब दहिफळे शशिकांत दहिफळे शुभम दहिफळे अशोक दहिफळे राजेंद्र शिंदे बाळूशेट लाहोटी मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे यांच्या हस्ते शस्त्र पूजन करण्यात आले श्री मोहटादेवीसमोर देवस्थानाची सर्व शस्त्र ठेवून पूजन करण्यात आले यावेळी जनसंपर्क अधिकारी भिमराव खाडे मोहटा ग्रामस्थ भाविकभक्त व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

सायंकाळी मोहटादेवस्थानचे मुख्य पुजारी भूषण साकरे भास्कर देशपांडे विकास क्षीरसागर या पुरोहितांच्या मंत्र उच्चातर विजया दशमीच्या शुभ मुहुर्तावर शस्त्र पूजन करण्यात आले पुजनानंतर सायंकाळी देवीची आरती संपन्न झाली शारदीय नवरात्रौत्सव दरम्यान मोहटादेवी गडावर लाखो भविक दर्शन घेण्यासाठी गर्दी करतात देवीचा होमहवन होऊन नवरात्रीची सांगता झाली दसऱ्याच्या दिवशी सायंकाळी देवस्थानाचे सर्व प्रकाराचे शस्त्र वाहने हिशोब लिखाणासाठी लागणारे वह्या आर्दीचे अत्यंत धार्मिक वातावरणात परंपरेनुसार पुजनाचा सोहळा गडावर देवी समोर पार पडतो यात्रेच्या देवीची पालखी सोहळा सवाद्य मिरवणूक गावातून काढली जाणार आहे गुरुवारी सकाळी कलावंतांच्या हजेऱ्यांचा कार्यक्रम संपन्न होऊन जंगी कुस्त्यांनी या यात्रेची सांगता तर कोजागरी पौर्णिमेला या शारदीय नवरात्र उत्सवाची सांगता होणार आहे.

नव्या पिढीला संस्कारांची शिदोरी देणे, हाच आमचा प्रामाणिक प्रयत्न-राहुल लोणीकर



जालना। प्रतिनिधी

आमदार बबनरावजी लोणीकर यांच्या संकल्पनेतून आणि राहुल भैया लोणीकर मित्रमंडळाच्या वतीने आयोजित राष्ट्रमाता जिजाऊ नवरात्रोत्सवात कीर्तनाच्या माध्यमातून भक्ती, संस्कार आणि समाजप्रबोधनाचा जागर करण्यात येत आहे. कीर्तनसेवेत प्रकाश महाराज साठे यांनी संत एकनाथ महाराजांच्या 'अनादि अंबिका भगवती, बोध परडी घेऊनी हाती, पोत ज्ञानाचा पाजळती, उदो उदो भक्त नाचती' या अभंगातून आदिशक्तीची महती, ज्ञानभक्तीचे महत्त्व आणि भक्तिभावाचा आनंद विशद केला.


राष्ट्रमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांसारख्या कर्तृत्ववान महिलांचे स्मरण करून त्यांनी मातृशक्तीचा सन्मान, कौटुंबिक नात्यांतील विश्वास, परस्पर आदर आणि संयमाचे महत्त्व पटवून दिले. स्त्रीचा सन्मान आणि संस्कारांचे जतन यातूनच सुसंस्कृत समाजाची निर्मिती होते, असा संदेश त्यांनी दिला.

राहुल लोणीकर म्हणाले, ''नवरात्रोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून संस्कृतीचे जतन, स्त्रीशक्तीचा सन्मान आणि भावी पिढीवर संस्कार करण्याची संधी आहे. राष्ट्रमाता जिजाऊंच्या विचारांतून प्रेरणा घेऊन समाजात बंधुभाव, महिलांविषयी आदर आणि चांगले संस्कार रुजवणे ही काळाची गरज आहे. भक्तीच्या माध्यमातून समाजाला सकारात्मक विचार आणि नव्या पिढीला संस्कारांची शिदोरी देणे, हाच या उपक्रमामागील आमचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. राष्ट्रमाता जिजाऊ नवरात्रोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक परंपरेसोबतच सामाजिक जाणीव, कौटुंबिक मूल्ये आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचा राहुल लोणीकर मित्रमंडळाचा प्रयत्न परतूरकरांचे लक्ष वेधून घेत आहे. यावेळी गणेशराव रोकडे लक्ष्मणराव रोकडे, सौ मंदाताई बबनराव लोणीकर शत्रुघ्न कणसे, संपत टकले, यांच्यासह मोठ्या संख्येने महिला व पुरुष उपस्थित होते.


जितेश्री डमाळे हिची महाराष्ट्र राज्य स्कूल नॅशनल कॅम्प साठी निवड

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील डमाळवाडी येथील जितेश्री विष्णू डमाळे हिची नुकतीच महाराष्ट्र राज्य स्कूल नॅशनल कॅम्प साठी निवड झाली आहे जितेश्री ही एम.एम.निराळी विद्यालयात इयत्ता अकरावी विज्ञान शाखेची विद्यार्थिनी असून ती शहरातील एस.व्ही.नेट क्रिकेट अकॅडमी येथे प्रशिक्षण घेत आहे तिचे वडील विष्णू डमाळे हे पाथर्डी एसटी डेपो येथे चालक पदावर कार्यरत आहेत जितेश्री ही अष्टपैलू खेळाडू असून तिने यापूर्वी पंधरा वर्षाखालील क्रिकेट संघाचे उपकर्णधारपद भूषवले आहे २०२३-२४ मध्ये १९ वर्षाखालील महाराष्ट्र राज्य संघात तिची निवड झाली कोलकत्ता आणि बडोदा येथे झालेल्या चॅम्पियन ट्रॉफी स्पर्धेत महाराष्ट्राला जेतेपद मिळवून देण्यात जितेश्री हिने अष्टपैलू खेळाडूची भूमिका पार पडली आता पुन्हा एकदा जितेश्री हिची महाराष्ट्र राज्य स्कूल नॅशनल कॅम्प साठी निवड झाल्याने तिने पाथर्डी तालुक्याचा मान महाराष्ट्रात उंचावला आहे तिच्या यशाबद्दल व पुढील वाटचालीसाठी पाथर्डीकरांनी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.



कशी सांगावी मैतरा दुष्काळाची ही कहाणी सारा विस्कटला गाव निळ्या नभाची करणी



प्रा.दादासाहेब खेडकर

पाथर्डी : पांढरीशुभ्र पडलेले ढग ओसाडलेली रान शेतातली उध्वस्त झालेली पिके नद्या ओढे तलाव विहिरी तळे कोरडेफट पडून त्यातील दिसणारे पाषाण पाण्यावाचून व चाऱ्यावाचून शेतात हंबरडा फोडणारी मुकी जनावरे ओसाड पडलेली धरणीमाय टाहो फोडून म्हणत आहे. कशी सांगावी मैतरा दुष्काळाची ही कहाणी, सारा इस्कटला गाव निळ्या नभाची करणी चोचभर चाऱ्यासाठी,देशोधडीला पाखर, वाट बघतो उंबरा येतो अंगणा गहिवर,दाही दिशा झाल्या सुन्या असं काय केलं पाप,टिचभर या पोटाचं कुठे भरायचं माप.

बसस्थानकासमोर युवकावर धारदार कोयत्याने हल्ला

लातूर

लातूर जिल्ह्यातील औसा शहरातील जुन्या बसस्थानकासमोर एका युवकावर धारदार कोयत्याने प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर लातूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. विशेष म्हणजे, हल्ला केल्यानंतर आरोपीने स्वतः औसा पोलिस ठाण्यात जाऊन आत्मसमर्पण केले आहे. मात्र, हा हल्ला नेमका कोणत्या कारणातून झाला, हे अद्याप अस्पष्ट असून पोलिस या प्रकरणाचा कसून तपास करत आहेत. औसा शहरातील जुन्या बसस्थानकासारख्या अत्यंत वर्दळीच्या ठिकाणी ही थरारक घटना घडल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणाला तत्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी सूत्रे हलवली. विशेष म्हणजे, हल्ला केल्यानंतर आरोपी स्वतःहून औसा पोलिस ठाण्यात जाऊन शरण आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या तपासाला अधिक वेग आला आहे. हा हल्ला नेमका कोणत्या पूर्ववैमनस्यातून किंवा कारणातून करण्यात आला, याचा कसून शोध पोलिसांकडून घेतला जात आहे. पोलिसतपासातून या प्रकरणाचा सविस्तर तपशील लवकरच स्पष्ट होईल. नवरात्रोत्सवात दांडिया खेळण्यासाठी गेल्यानंतर मित्रांसोबत फिरत असताना झालेल्या किरकोळ वादात आईवरून शिवी दिल्याच्या रागातून २० वर्षांच्या तरुणाची त्याच्याच मित्राने लोखंडी रॉडने हत्या केली. मुकुंदवाडीतील संघर्षनगर भागात सोमवारी मध्यरात्री हा प्रकार घडला.

आशिष दायमा बीएएमएस परीक्षेत उत्तीर्ण

मंठा । प्रतिनिधी



मंठा येथील आशिष मुन्नालाल दायमा यांनी मानसरोवर ग्लोबल युनिव्हर्सिटी, सिहोर (मध्यप्रदेश) येथून बॅचलर ऑफ आयुर्वेदिक मेडिसिन अँड सर्जरी (बी ए एम एस) या आयुर्वेदाचार्य अभ्यासक्रमाची परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच मंठा शहरातील नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

मानसरोवर ग्लोबल युनिव्हर्सिटीच्या जुलै २०२६ मध्ये झालेल्या परीक्षेत आशिष दायमा यांनी विविध विषयांमध्ये विशेष प्राविण्य मिळविले आहे. या क्षेत्रात वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून आशिष दायमा यांनी आपल्या शैक्षणिक कारकिर्दीत महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले. भविष्यात आयुर्वेदाच्या माध्यमातून समाजाची सेवा करण्याचे आणि आपल्या ज्ञानाचा उपयोग रुग्णांच्या हितासाठी करण्याचे ध्येय त्यांनी ठेवले आहे.

पैठण-पंढरपूर ७५२ इ पालखी मार्गाचा मावेजा न दिल्याने शेतकरी आक्रमक

भूसंपादित शेतकऱ्यांचे २६ ऑक्टोबरला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील मिडसांगवी येथून गेलेल्या पैठण ते पंढरपूर ७५२ इ या पालखी मार्गासाठी मिडसांगवी गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी भूसंपादित करण्यात आल्या होत्या या शेतकऱ्यांच्या भूसंपादित केलेल्या गेल्या दहा वर्षापासून मावेजा न दिल्याने शेतकरी आक्रमक झाले असून यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर येथे २६ ऑक्टोबर पासून उपोषण करण्याची तयारी दर्शवली आहे याबाबत अधिक माहिती अशी की पैठण पंढरपूर पालखी मार्गाला २०१६ या वर्षी तांत्रिक मान्यता मिळाली नोव्हेंबर २०१७ ला जमिनीची मोजणी होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली जानेवारी २०१८ ला शेतकऱ्यांच्या जमिनी प्रत्यक्ष ताब्यात घेऊन अधिग्रहित करण्यात आल्या व जानेवारी २०२३ ला शेतकऱ्यांच्या जमिनीचा निवाडा जाहीर करण्यात आला तेव्हापासून अद्याप पर्यंत शेतकऱ्यांच्या जमिनीचा मावेजा मिळालेला नाही या संदर्भात आमदार मोनिका राजळे



यांच्यासमवेत मिडसांगवी येथील शेतकऱ्यांच्या सोबत कोकण भवन मुंबई येथे बैठक झाली त्यानंतर राष्ट्रीय महामार्ग उपविभाग छत्रपती संभाजी नगर कार्यालयाने शेतकऱ्यांच्या भूसंपादित केलेल्या जमिनीचा मावेजा झालेला निवाडा रद्द झाल्याचे कळवले व एन एच ऍक्ट प्रमाणे पुन्हा जमिनीची नव्याने मोजणी होणार असल्याचे सांगितले यामुळे संबंधित शेतकऱ्यांच्यावर अन्याय होणार आहे गेल्या दहा वर्षांपासून रस्त्याचे काम अपूर्ण असून रस्त्यावर धुळीचे साम्राज्य पसरले आहे शेतकऱ्यावर दुष्काळाचे मोठे संकट असून राष्ट्रीय महामार्ग विभाग व सरकारने तातडीने व संपादित शेतकऱ्यांच्या जमिनीचा मावेजा देण्याची कारवाई करावी अशी मागणी केली आहे अन्यथा २६ ऑक्टोबर पासून जिल्हाधिकार्यालय अहिल्यानगर येथील उपोषण करणार असल्याचे लेखी पत्र पठाडे अशोक घोंगडे राम पठाडे संपत पठाडे लक्ष्मण पठाडे खालील शेख अशोक सुळ यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

एन एच ऍक्ट प्रमाणे पैठण पंढरपूर पालखी महामार्गासाठी मिडसांगवी येथील शेतकऱ्यांच्या भूसंपादित केलेल्या जमिनीचा मावेजा गेल्या दहा वर्षापासून प्रलंबित असल्याने व जुना निवडा रद्द केल्याने राष्ट्रीय महामार्ग विभाग व सरकारने जुना निवाड्याप्रमाणे शेतकऱ्यांना दहा वर्षाचे १२ टक्के व्याजदर याप्रमाणे रक्कम अदा करावी व भूसंपादित केलेल्या जमिनीमध्ये रस्त्याच्या कडेला फळबाग होती त्याच्या नुकसानी पोटी प्रति ५००० हजार रुपये प्रमाणे नुकसान भरपाई द्यावी.

धनंजय पठाडे (भूसंपादित शेतकरी)

दुर्गा सप्तशती नवचंडी पाठ व होम-हवन उत्साहात संपन्न



मंठा। प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील शिवशक्ती पीठ, योगीधाम दहीफळ (ख.) येथे नवरात्रोत्सवानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही प.पू. तपस्वी योगी श्री योगानंद बाबांच्या मार्गदर्शनाखाली दुर्गा सप्तशती नवचंडी पाठ व होम-हवन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या धार्मिक कार्यक्रमात वे.शा.सं. प्रसाद जोशी यांच्या मंत्रोच्चारात विधिवत होम-हवन संपन्न झाले. यावेळी परिसरातील हजारो भाविक भक्तांनी उपस्थित राहून धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेतला.

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर योगीधाम येथे दररोज पूजा, पाठ व आरतीचे आयोजन करण्यात आले होते. दररोज आरतीसाठी भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच बंजारा भजनाच्या कार्यक्रमालाही प्रतिसाद मिळाला. भक्तिमय वातावरणात झालेल्या या कार्यक्रमामुळे परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते. आयोजकांच्या वतीने उपस्थित भाविकांसाठी आवश्यक व्यवस्था करण्यात आली होती.

दैनिक
राज्य लोकतंत्र
गुरूवार दि.२२ ऑक्टोबर २०२६ | ६

टालेवाडी फाट्यावर भरदिवसा थरार!

घरात घुसून चोरी करणाऱ्या चोरट्यांना नागरिकांनी पकडले, चाकूहल्ल्यात एक जण गंभीर जखमी



शेतकऱ्याच्या मुलावर चाकूने वार; एक चोरटा नागरिकांच्या ताब्यात, दोघे दुचाकीवरून पसार; दोन लाखांची रोकड व सोन्याचे दागिने लंपास

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील खामगाव-पंढरपूर पालखी महामार्गावरील टालेवाडी फाटा परिसरात भरदिवसा चोरीच्या घटनेने खळबळ उडाली आहे. शेतकरी तिडके यांच्या घरात घुसून चोरी करणाऱ्या चोरट्यांना विरोध केल्याने एका व्यक्तीवर चाकूने हल्ला करण्यात आला.या हल्ल्यात संबंधित व्यक्ती गंभीर जखमी झाली आहे.दरम्यान, नागरिकांनी प्रसंगावधान राखत एका चोरट्याला रंगेहात पकडून चोप दिला आणि नंतर पोलिसांच्या स्वाधीन केले. मात्र, त्याचे अन्य दोन साथीदार दुचाकीवरून पळून जाण्यात यशस्वी झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

यासंदर्भात मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, टालेवाडी फाटा परिसरातील शेतकरी तिडके यांच्या घरात दि २१ ऑक्टोबर बुधवार रोजी दुपारी १:३० वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी प्रवेश करून चोरी करण्यास सुरुवात केली.यावेळी घरातील व्यक्तींनी चोरीला विरोध केला.त्यामुळे चोरट्यांनी आक्रमक भूमिका घेत चाकूने हल्ला केला.या हल्ल्यात एका व्यक्तीला गंभीर दुखापत झाली असून, परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

चोरी आणि चाकूहल्ल्याची घटना समजताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांनी धाडस दाखवत एका चोरट्याला पकडले.संतप्त नागरिकांनी त्याला चोप दिल्यानंतर पोलिसांच्या स्वाधीन केले. मात्र,या गोंधळाचा फायदा घेत अन्य दोन चोरटे दुचाकीवरून घटनास्थळावरून पसार झाले.फरार चोरट्यांचा शोध घेण्याचे आव्हान आता पोलिसांसमोर आहे.

दोन लाखांची रोकड आणि सोन्याचे दागिने लंपास

या चोरीच्या घटनेत सुमारे दोन लाख रुपये रोख आणि सोन्याचे दागिने लंपास झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.भरदिवसा घरात घुसून चोरी करणे,विरोध करणाऱ्यावर चाकूहल्ला करणे आणि त्यानंतर दोन आरोपींचे पसार होणे,या प्रकारामुळे टालेवाडी फाटा परिसरातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

पोलिसांकडून तपासाची अपेक्षा

या घटनेतील पकडलेल्या संशयिताकडून फरार साथीदारांची माहिती मिळवून त्यांना तातडीने अटक करावी, तसेच चोरीस गेलेली रोकड आणि सोन्याचे दागिने हस्तगत करावेत,अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांनी गस्त वाढवून अशा घटनांना आळा घालावा,अशी मागणीही होत आहे.

प्रवासात चोरी करणारी महिला 'स्थानिक गुन्हे शाखे'च्या जाळ्यात; अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त

बीड । प्रतिनिधी

प्रवासादरम्यान चोरी करणाऱ्या एका महिलेला स्थानिक गुन्हे शाखेच्या (डउइ) पथकाने शिताफीने ताब्यात घेतले आहे. तिच्याकडून तब्बल १७ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा मिळून सुमारे अडीच लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, बीड येथील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा रजिस्टर क्रमांक ३३६/२०२६, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता (इछड) अन्वये चोरीच्या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेमार्फत सुरू होता. तपास सुरू असताना, या गुन्ह्यातील चोरीचे सोने विक्री करण्यासाठी एक संशयित महिला बीड शहरातील गोरे वस्ती परिसरात येणार असल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी गोरे वस्ती परिसरात सापळा रचून सदर संशयित महिलेस ताब्यात घेतले. तिच्याकडे कसून चौकशी केली असता तिने या चोरीच्या गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी तिच्या ताब्यातून १७ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा जवळपास अडीच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पुढील कायदेशीर कारवाईसाठी या संशयित महिलेला शिवाजीनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

नारायणगड, भगवान भक्तीगडावर डॉ.योगेश क्षीरसागरांनी घेतले दर्शन

दसरा मेळाव्यानिमित्त श्रद्धास्थळांना भेट देत संत-महंतांचे घेतले आशीर्वाद

बीड । प्रतिनिधी

विजयादशमीच्या पावन पर्वानिमित्त भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शिरूर कासार तालुक्यातील श्री क्षेत्र नारायणगड (धाकटी पंढरी) आणि पाटोदा तालुक्यातील सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगडावर भेट देऊन मंगळवारी (दि.२०) दर्शन घेतले. विजयादशमीच्या निमित्ताने या दोन्ही गडांवर दर्शन घेऊन संत-महंतांचे आशीर्वाद घेत डॉ.योगेश क्षीरसागर यांनी धार्मिक परंपरा जपली.





श्री क्षेत्र नारायणगड येथे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन केले. त्यानंतर नगद नारायण महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी महंत ह.भ.प.शिवाजी महाराज यांचा सत्कार करून त्यांचे आशीर्वाद घेतले. महाराजांच्या हस्ते डॉ.क्षीरसागर यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते, समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यानंतर डॉ.क्षीरसागर यांनी पाटोदा तालुक्यातील सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगडावर जाऊन संत भगवान बाबांच्या चरणी नतमस्तक होत आशीर्वाद घेतले.

विस्तार अधिकारी नांदुरकरांना 'सीईओं'नी झापले

बीड । प्रतिनिधी

येथील सर्व शिक्षा अभियानाच्या सहाय्यक कार्यक्रम अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार दिल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश डावलणारे शिक्षण विस्तार अधिकारी नांदुरकर यांना जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी चांगलेच धारेवर धरले.

नांदुरकर यांच्याकडे मागणीनुसार दि. १९ सप्टेंबर २०२६ रोजी सहायक कार्यक्रम पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता. अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या प्रश्न सोडविण्याच सीईओ सांगितले. मात्र त्यांनी लक्ष दिले नाही.

अचानक नांदुरकर रजेवर निघून गेले. त्यामुळे सीईओ'नी त्यांना झापल्याची चर्चा आहे.दरम्यान समग्र शिक्षाच्या सहाय्यक कार्यकाम अधिकारी पदाचा कार्यभार अन्य विस्तार अधिकारी यांच्याकडे देण्यात आला आहे.

बीड जि. प. प्राथमिक शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्याला २० हजार रुपयांचा दंड

बीड । प्रतिनिधी

माहिती अधिकार कायद्यानुसार विहित मुदतीत माहिती उपलब्ध न करून देणे आणि आयोगाच्या आदेशांकडे दुर्लक्ष करणे बीड जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागातील जन माहिती अधिकाऱ्याला चांगलेच भोवले आहे. राज्य माहिती आयोग, छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकाऱ्याला २०,००० रुपयांचा दंड (शास्ती) ठोठावला असून, ही रक्कम संबंधित अधिकाऱ्याच्या वेतनातून वसूल करण्याचे आदेश दिले आहेत.

तलवाडा (ता. गेवराई, जि. बीड) येथील श्री. एकनाथ शंकरराव बांगर यांनी २५ एप्रिल २०२५ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाकडे माहिती अधिकार कायद्यान्वये अर्ज दाखल केला होता. मात्र, विहित मुदतीत जन माहिती अधिकाऱ्याने माहिती अथवा माहितीसंदर्भात कोणतीही वस्तुस्थिती अर्जदारास उपलब्ध करून दिली नाही. त्यामुळे अर्जदाराने आयोगाकडे द्वितीय अपील (क्र. ४४५८/२०२५) दाखल केले.

या प्रकरणात सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांच्या वतीने ड. व्ही. ए. मुंढे यांनी आयोगापुढे बाजू मांडली व आयोगाच्या आदेशानंतरही माहिती मिळाली नसल्याचे निदर्शनास आणून दिले. आयोगाने संबंधित जन माहिती अधिकाऱ्यास लेखी व तोंडी खुलासा मांडण्याची पुरेशी संधी दिली होती; मात्र अधिकाऱ्याने कोणताही खुलासा सादर केला नाही आणि पूर्वपरवानगीशिवाय ते सुनावणीस गैरहजर राहिले. अधिकाऱ्याचा हा दृष्टिकोन माहिती अधिकार कायद्याकडे बघण्याचा पूर्णतः नकारात्मक आणि जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणारा असल्याचा ठपका आयोगाने ठेवला.

वेतातून रक्कम वसूल करण्याचे आ

माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील ◀◀ पान ३ वर



बीड : विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर भगवानगडाच्या महंतपदी ह. भ. प. कृष्णा महाराज शास्त्री यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांना रितसर भगवानगडाच्या गादीवर बसवून भगवान गडाचे तिसरे महंत न्यायाचार्य नामदेव शास्त्री महाराज यांनी त्यांचा सत्कार केला. आज पासून भगवानगडाचे चौथे महंत म्हणून ह. भ .प. कृष्णा महाराज शास्त्री ओळखले जातील.

बीड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती सौ. सरला मुळे यांची 'मराठवाडा सहकार आयकॉन' पुरस्कारासाठी निवड

बीड । प्रतिनिधी

बीड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती सौ.सरला कामराज मुळे यांची कृषी व सहकार क्षेत्रातील योगदानाची दखल घेत 'मराठवाडा सहकार आयकॉन पुरस्कार २०२६'साठी निवड करण्यात आली आहे. दैनिक नवभारत व नवराष्ट्र समूहाच्या वतीने आयोजित 'मराठवाडा आयकॉन सन्मान सोहळा २०२६'मध्ये त्यांना पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

कृषी व सहकार क्षेत्रातील कार्याची दखल; बीडच्या रेशीम बाजारपेठेत ५६ हजारांहून अधिक शेतकऱ्यांचा सहभाग

बीड बाजार समिती येथे कार्यरत असलेल्या रेशीम बाजार पेठ भारतात दुसऱ्या स्थानी आहे. पुरस्कार सोहळा रविवार, १३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता छत्रपती संभाजीनगर येथील हॉटेल ट्रीट इम्पेरियल, एपीआय कॉर्नर, जालना रोड येथे होणार आहे. छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाठ, माजी मंत्री तथा खासदार संदीपान भुमरे, नवभारत समूहाचे सीओओ ए. श्रीनिवास आणि कार्यकारी संपादक संजय मलमे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे.

सभापती सौ.सरला मुळे यांच्या नेतृत्वाखाली बीड कृषी उत्पन्न बाजार समितीअंतर्गत रेशीम कोष खरेदी-विक्री बाजारपेठेत पारदर्शक लिलाव व्यवस्था, व्यापाऱ्यांमधील स्पर्धा आणि जलद व्यवहारावर भर देण्यात आला आहे. आतापर्यंत ५६ हजार १२९ शेतकऱ्यांकडून ५८ लाख ७१ हजार ४०४ किलो रेशीम कोषांची आवक झाली असून, त्यातून २६७ कोटी रुपयांपेक्षा अधिक उलाढाल झाली आहे. ऑगस्ट २०२६ मध्ये रेशीम कोषाला प्रतिकिलो ९३० रुपये, म्हणजेच प्रतिकिंटल ९३ हजार रुपये दर मिळाला. बीडसह पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना तसेच विदर्भातील शेतकरी येथे रेशीम कोष विक्रीसाठी आणत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचा ◀◀ पान ३ वर

यंदा १८ ते २२ डिसेंबरदरम्यान गेवराईत राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन!

हायड्रोपोनिक चारा, जलतारा प्रकल्पासह कमी पाण्यातील शेतीचे मिळणार धडे ; कृषिभूषण महेश बेदरे यांची माहिती

गेवराई । प्रतिनिधी

मराठवाड्यातील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती मिळावी, शेतीतील नवनवीन प्रयोगांची ओळख व्हावी आणि बदलत्या हवामानासह दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना सक्षम करता यावे, या उद्देशाने किसान कृषी विकास प्रतिष्ठानच्या वतीने गेवराई येथे १८ ते २२ डिसेंबर २०२६ या कालावधीत भव्य राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. स्वर्गीय कृषिरत्न गणेशराव बेदरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बीड रोडवरील आठ एकर विस्तीर्ण दसरा मैदानावर पाच दिवस चालणाऱ्या या कृषी महोत्सवात हायड्रोपोनिक चारा निर्मिती, आधुनिक सिंचन पद्धती, कमी पाण्यातील शेती आणि जलतारा प्रकल्पासह विविध कृषी तंत्रज्ञानाची प्रात्यक्षिके शेतकऱ्यांना पाहता येणार आहेत. अशी माहिती प्रदर्शन आयोजन समितीचे संयोजक कृषिभूषण महेश बेदरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.



किसान कृषी विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून गेल्या १९ वर्षांपासून मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी प्रदर्शनांचे आयोजन केले जात आहे. बीड, जालना, परभणी, हिंगोली यांसह विविध भागांत या उपक्रमाच्या माध्यमातून आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रसार केला जातो. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आग्रहास्तव यंदाही गेवराईत या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना पारंपरिक शेतीसोबतच आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देता यावी, उत्पादन खर्च कमी करून शेती अधिक फायदेशीर करता यावी आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करता यावा, हा या कृषी महोत्सवामागील प्रमुख उद्देश आहे.

बदलत्या हवामानामुळे शेतीसमोर निर्माण होणारी आव्हाने, पावसातील अनिश्चितता आणि दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता यंदाच्या प्रदर्शनात पाणी व्यवस्थापनावर विशेष भर देण्यात येणार आहे. कमी पाण्यात पिके जगविण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या विविध सिंचन साधनांची प्रात्यक्षिके येथे सादर केली जाणार आहेत. तसेच महाराष्ट्रात चर्चेत असलेल्या जलतारा प्रकल्पाची माहितीही शेतकऱ्यांना दिली जाणार आहे.

दुष्काळाच्या संकटात हतबल होऊ नका; चुकीचा निर्णय घेण्यापूर्वी एक फोन सुरेश धस यांना करा!

श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावरून आमदार सुरेश आण्णा धस यांचे शेतकरी व नागरिकांना आश्वासक आवाहन



आष्टी । प्रतिनिधी

आगामी काळात दुष्काळाची तीव्रता वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांनी आतापासूनच सतर्क राहावे, अनावश्यक खर्चाला आळा घालावा आणि आर्थिक नियोजन करावे. संकटाच्या काळात भावनेच्या भरात कोणताही टोकाचा निर्णय घेऊ नका. अडचणीत असाल, तर एक फोन सुरेश धस यांना करा; तुमच्या मदतीसाठी मी २४ तास तत्पर आहे, अशा शब्दांत आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश (आण्णा) धस यांनी श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावरून शेतकरी आणि नागरिकांना धीर दिला.

श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावर आयोजित दसरा मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी संभाव्य दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, कुटुंबप्रमुख, पशुधन आणि वन्यजीवांच्या संरक्षणाबाबत महत्त्वपूर्ण आवाहन केले. संकट कितीही मोठे असले, तरी संयम, योग्य नियोजन आणि एकजुटीच्या बळावर त्यावर मात करता येते, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मायंबा हे केवळ धार्मिक स्थळ नव्हे, तर स्फूर्तीचे केंद्र!

श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाविषयी आपल्या भावना व्यक्त करताना आमदार धस म्हणाले की, मायंबा हे लोहचुंबकासारखे आकर्षण असलेले श्रद्धास्थान आहे. एकदा या पवित्र भूमीत आल्यानंतर पुन्हा पुन्हा येथे यावेसे वाटते. हे स्थान केवळ धार्मिक महत्त्वाचे नसून मनाला ऊर्जा आणि जीवनाला स्फूर्ती देणारे आहे.

या पवित्र व्यासपीठाची परंपरा आणि पावित्र्य जपण्याची भूमिका स्पष्ट करत त्यांनी येथे कोणतेही राजकीय भाष्य केले नाही आणि यापुढेही करणार नसल्याचे सांगितले. राजकीय विचार मांडण्यासाठी अन्य व्यासपीठे उपलब्ध आहेत. त्यामुळे मायंबाच्या पवित्र भूमीवर श्रद्धा, संस्कार आणि समाजप्रबोधनालाच महत्त्व दिले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच पुढील वर्षापासून विजयादशमीच्या आदल्या दिवशी शस्त्रपूजन करून दसरा मेळावा आयोजित करण्याचा उपक्रम सुरू करणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

दुष्काळाचे सावट; कुटुंबप्रमुखांनी आतापासूनच नियोजन करावे

येत्या काळात दुष्काळाचे संकट अधिक गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत प्रत्येक कुटुंबातील कर्ता व्यक्तीने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून खर्चावर नियंत्रण ठेवणे, उपलब्ध पैशांचा योग्य विनियोग करणे आणि भविष्यातील गरजांचा विचार करून आर्थिक नियोजन करणे आवश्यक आहे, असे आवाहन आमदार धस यांनी केले.

दुष्काळाचा परिणाम केवळ शेती आणि माणसांपुरता मर्यादित राहत नाही. पाण्याअभावी पशुधनासह वन्यजीवांनाही मोठ्या संकटाचा सामना करावा लागतो. त्यामुळे या मुक्या ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26